अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार दि. १४ डिसेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ७८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# चंद्रकांत पाटलांचा राग विजयकुमार देशमुखांवर, शाईफेकीचा आरोप भीम आर्मीच्या कार्यकर्त्यावर

✔ सुराज्य/सोलापूर

**महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल बदनामीकारक वक्तव्य केल्यानंतर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर पिंपरी-चिंचवडमध्ये शाईफेक केल्याचे प्रकरण ताजे असतानाच त्याचीच पुनरावृत्ती मंगळवारी सायंकाळी सोलापुरात घडली. भाजपचे आ. विजयकुमार देशमुख यांच्या अंगावर एका सामूहिक विवाह सोहळ्यात भीम आर्मीच्या कार्यकर्त्याने शाईफेक करण्याचा प्रयत्न केला.**



मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या अवमानकारक व्यक्तव्यानंतर राज्यभरातून तीव्र भावना उमटत आहेत. त्यांचा सर्वत्र निषेध नोंदवण्यात येत आहे. त्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी जाहीर माफी मागितली आहे. माफी मागितल्यानंतरही पाटील यांच्यावर पिंपरी-चिंचवड येथे शाईफेक करण्यात आली. हे प्रकरण ताजे असतानाच सोलापुरात आ.देशमुख यांच्या अंगावरही शाई टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सम्राट चौक परिसरातील न्यू बुधवार पेठ येथील बुध्दराष्ट्र प्रतिष्ठान यांच्यावतीने मंगळवारी सायंकाळी सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आ. देशमुख हे प्रमुख पाहुणे होते. ते सायंकाळी त्याठिकाणी गेले असता एका भीमसैनिकाकडून आमदार देशमुख यांच्या अंगावर शाई टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. संबंधित युवक भीम आर्मी संघटनेचा होता. त्या युवकाला जोडभावी पेठ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### पोलिसांवरही पडली शाई

मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक झाल्यानंतर राज्यातील सर्वच भाजप व शिंदे गटाच्या आमदारांची सुरक्षाव्यवस्था कडक करण्यात आली आहे. आ.विजय देशमुख यांनाही सुरक्षा पुरवण्यात आली आहे. विवाहस्थळी गर्दी असल्यामुळे पोलिसांनी जादा बंदोबस्त लावला होता. तरीही भीम आर्मीच्या एका कार्यकर्त्याने आ. देशमुखांवर शाईफेक करण्यात आली. यावेळी बंदोबस्तावरील पोलीस आणि अन्य नागरिकांच्या अंगावरही शाई पडली होती.

### जोडभावीपेठ पोलीस ठाण्यात तुफान गर्दी

दरम्यान, विवाहस्थळी असलेल्या पोलिसांनी शाईफेक करणाऱ्या अजय मैंदर्गीकर या भीम आर्मीच्या कार्यकर्त्याला जागेवर पकडले. त्यामुळे विवाहस्थळी काहीवेळ गोंधळ उडाला. मात्र पोलिसांनी मैंदर्गीकर यास तात्काळ जोडभावीपेठ पोलीस ठाण्यात आणले. यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी आणि आ. देशमुख समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. बाहेर गर्दी आणि पोलीस ठाण्यात कार्यवाही असे चित्र दिसत होते.

### असे काही घडलेच नाही

याप्रकरणी आ. विजय देशमुख यांना संपर्क साधला असता असा काही प्रकार घडलाच नाही असे सांगून ते मोकळे झाले. अधिक विचारणा केली असता त्यांनी जास्त बोलण्यास नकार दिला. मात्र माजी नगरसेवक संजय कोळी यांनी शाईफेक करण्याचा प्रयत्न झाला, त्याचवेळी शाईफेक करणाऱ्यास पोलिसांनी पकडले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला असे सांगितले.


### आमदार आले शर्ट बदलून

दरम्यान, आ. विजयकुमार देशमुख यांच्या शर्टवर शाईचे शिंतोडे उडाले. तोपर्यंतच शाईफेक करणाऱ्या कार्यकर्त्यास पोलिसांनी पकडून नेले. तितक्यात आ. देशमुख यांच्या कार्यकर्त्यांनी दुसरा शर्ट आणला. त्यानंतर शाई पडलेला शर्ट बदलून आ. देशमुख विवाहसोहळ्यास थांबले, अशी माहिती विवाह सोहळ्यातील उपस्थितांकडून सांगण्यात आली.

# बहुचर्चित ॲड.कुंभकोणी यांचा राजीनामा अखेर मंजूर

✔ सुराज्य/सोलापूर

राज्याचे महाधिवक्ता तथा सोलापूरचे ज्येष्ठ विधिज्ञ आशुतोष कुंभकोणी यांचा राजीनामा अखेर स्वीकारला गेला. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब केले गेले.महाविकास आघाडीचे सरकार गडगडल्यानंतरही शिंदे-फडणवीस या नव्या सरकारकडून महाधिवक्ता म्हणून कुंभकोणी यांचीच नियुक्ती कायम ठेवण्यात आली होती.



गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या राजीनाम्यावर उलटसुलट चर्चा सुरू होती. राज्यातील विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर कुंभकोणी यांनी प्रथेप्रमाणे आपला राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द केला होता. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार स्थापन झाल्यानंतर राज्यपालांनी हा राजीनामा मंत्रिमंडळाच्या विचारार्थ पाठवला. मंत्रिमंडळाने ४ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत कुंभकोणी यांचा राजीनामा अस्वीकृत ठरवून त्यांनाच यापदी कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आणि तो राज्यपालांना कळवला. त्यानुसार राज्यपालांच्या आदेशाप्रमाणे कुंभकोणी यांनाच कायम ठेवण्याविषयीची अधिसूचना मुख्य सचिव अजय मेहता यांच्या स्वाक्षरीने ७ डिसेंबर रोजी काढण्यात आली. आधी युती सरकार, त्यानंतर महाविकास आघाडी सरकार आणि आता शिंदे सरकार, अशा सलग तीन सरकारांच्या कार्यकाळात कुंभकोणी हेच राज्याचे महाधिवक्ता म्हणून कायम राहिले. ठाकरे यांनी राजीनामा दिल्यानंतर प्रथेप्रमाणे कुंभकोणी यांनीही दिलेल्या राजीनाम्यावरील निर्णय शिंदे सरकारने ३१ डिसेंबरपर्यंत स्थगित ठेवला होता. त्यामुळे तोपर्यंत तेच महाधिवक्ता म्हणून कार्यरत राहणार असल्याचे स्पष्ट झाले होते. राज्यात सलग व तीन वेगवेगळ्या सरकारांच्या कार्यकाळात तेच महाधिवक्ता राहिल्याचे बहुधा देशभरात प्रथमच घडत आहे. कुंभकोणी यांची प्रथम देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप-शिवसेना युती सरकारच्या काळात ७ जून २०१७ रोजी महाधिवक्ता म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात सत्तापालट होऊन २८ नोव्हेंबर २०१९ रोजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसचे महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात आले. त्या सरकारने कुंभकोणी यांनाच त्यापदी कायम ठेवले.

**चौकशीची मागणी :** ज्येष्ठ विधिज्ञ कुंभकोणी यांचा राजीनामा स्वीकारल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.त्यामुळे त्यांचे राजीनामा प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याची चिन्हे दिसत आहे. सत्तेत आल्यानंतर कुंभकोणी यांना का बदलले नाही? कुंभकोणी महाधिवक्ता असतानाच कोर्टाचे निर्णय राज्य सरकारच्या विरोधात का येतात? असे प्रश्न उपस्थित करून पटोले यांनी आपल्या संशयाबद्दल मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करून चौकशीची मागणी करू असे म्हटले आहे.

## विवाहित इसमाची गळफासाने आत्महत्या

✔ सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट रोड परिसरातील अंबिका नगरात राहणाऱ्या एका ३८ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. योगीनाथ मल्लय्या हिरेमठ (वय ३८ रा. अंबिका नगर) असे मयताचे नाव आहे. दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घरातील पहिल्या मजल्यावर असलेल्या खोलीतील छताच्या लोखंडी अँगलला त्याचा मृतदेह वायरने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत योगीनाथ हिरेमठ हा मजुरी करीत होता. त्याच्या पश्चाताप पत्नी एक मुलगा एक मुलगी आणि आई असा परिवार आहे. तो दुपारी घरी येऊन भांडण करीत होता. त्यामुळे त्याची पत्नी आणि मुले माहेरी गेले होते. यादरम्यान त्याने आत्महत्या केली. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार कांबळे पुढील तपास करीत आहेत.

# बनावट नोटाप्रकरणी आणखी तिघांना अटक

✔ सुराज्य/सोलापूर

कुर्डूवाडीच्या (ता.माढा, जि.सोलापूर) हद्दीत एका महाविद्यालयीन तरुणाला अटक करून अडीच लाखांच्या बनावट नोटा जप्त केल्या होत्या. ग्रामीण गुन्हे शाखेने खोलात तपास करून आणखी तिघांना अटक केली.त्यामुळे या टोळीची संख्या चार झाली आहे.

या कारवाईत अटकेतील आरोपींकडून प्रिंटर, संगणक, नोटा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हर्षल शिवाजी लोकरे(वय २० रा.कंदर,ता. करमाळा), सुभाष दिगंबर काळे (वय ३६, भोसले-ता.माढा), प्रभाकर ऊर्फ गणेश सदाशिव शिंदे(वय ३८, रा.शाहू नगर, भोसरे), पप्पू भारत पवार (वय ३० रा.अर्जून नगर,करमाळा) अशी अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. त्यांना न्यायालयाने १५ डिसेंबरपर्यंतच्या कोठडीत वाढ करण्याचा आदेश दिला आहे.

पोलिसांनी या चौघांना अटक करून अधिक माहिती विचारली असता, त्यांनी आयुष्यात स्थिरस्थावर होण्यासाठी, किंवा कोणताही एक व्यवसाय करण्यासाठी हा बनावट नोटांचा उद्योग सुरू केल्याच्या माहिती दिली. याबाबत पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी अधिकृत माहिती मंगळवारी सोलापुरात पत्रकार परिषदेत दिली.




**इन्स्टिट्यूटमध्ये छापल्या नोटा :** पप्पू पवार याने डीटीपी संगणक कोर्स पूर्ण झाला आहे. पप्पूने करमाळा तालुक्यातील कंदर या ठिकाणी आर्यन कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट सुरू केली होती. अनेक विद्यार्थ्यांना येथून त्याने संगणकाचे धडे दिले. चार महिन्यांपूर्वी पप्पू पवार, हर्षल लोकरे, सुभाष काळे, प्रभाकर शिंदे हे एकत्र आले आणि व्यवसाय सुरू करण्यासाठी प्लॅनिंग केलं. व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांच्याकडे पैसा नव्हता, म्हणून त्यांनी बनावट नोटा छापून पैसे जमा करण्याचा डाव आखला. पप्पू पवार हा डीटीपीमध्ये तरबेज होता. त्याने पुणे येथील उरुळी कांचन या ठिकाणी भाड्याने खोली घेतली आणि जवळपास ६ लाखांच्या बनावट नोटा छापल्या.

**ते शोधत होते ग्राहक :** हुबेहूब ५०० च्या नोटा छापल्यानंतर चौघे ग्राहक शोधत होते. त्यावेळी सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेला याची माहिती मिळाली. त्यांनी ताबडतोब बनावट नोटा घेऊन येणाऱ्यांवर पाळत ठेवली. ३ डिसेंबर रोजी हर्षल लोकरे यास ताब्यात घेऊन ५०० रुपयांच्या ४९३ बनावट नोटा जप्त केल्या. त्याला खाक्या दाखवताच हर्षलने पोपटासारखी माहिती दिली. त्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुभाष काळे याला टेंभुर्णी येथे महामार्गावर ५०० रुपयांच्या ५८० नोटा जप्त केल्या.

**१०० बनावट नोटा जप्त :** त्यानंतर प्रभाकर उर्फ गणेश शिंदे याला अटक करून ५०० रुपयांच्या १०० बनावट नोटा जप्त केल्या. अशा प्रकारे पोलिसांनी ५ लाख ८६ हजारांच्या बनावट नोटा जप्त करून पोलीस कोठडीत रवानगी केली. हुबेहूब बनावट नोटा छापणाऱ्या पप्पू पवार याला पुण्यातील उरुळीकांचन येथून अटक केले व संगणक, प्रिंटर व इतर साहित्य जप्त केले.

**भलताच उद्योग सुरू केला :** चौघांना पैशांची खूप गरज होती. हॉटेल व्यवसाय सुरू करून ते एक चांगले आयुष्य जगणार करणार होते. पण व्यवसाय सुरू करण्यासाठी खऱ्या नोटांची गरज होती. ती गरज भागवण्यासाठी या चौघांनी बनावट नोटा छापण्याचा भलताच उद्योग सुरू केला आणि ते गुन्हे शाखेच्या हाती लागले. यामध्ये पोलीस निरीक्षक सुहास जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक धंनजय पोरे यांनी दिली. याबाबत पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी अधिकृत माहिती दिली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



म्हणून मी शाईपेन वापरत नाही !!!


| कल्याण |
| --- |
| --- |

| मेन बाजार |
| --- |
| --- |

# सोलापूरच्या विमानसेवेसाठी कोल्हापूरचे महाडिक धावले; खा.जयसिध्देश्वर महास्वामी गप्प राहिले

✔ **सोलापूर** : कोल्हापूरचे असूनही सोलापूरवर विशेष जिव्हाळा असलेले राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांनी सोलापूर विकास मंचच्या वतीने गेल्या संपूर्ण महिनाभर आयोजित चक्री उपोषणाची विशेष व्यक्तिगत दखल घेत राज्यसभेत सोमवारी होटगी रोड विमानतळावरून नागरी विमान सेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी केली. दुसरीकडे सोलापूरचे लोकप्रतिनिधी या विषयावर गप्प का अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली आणि पुढाकाराने सोलापूर विकास मंचचे सदस्य विजय कुंदन जाधव, गणेश पेनगोंडा आणि रोहित मोरे यांनी मुंबई येथील मुख्यालयात कोल्हापूरचे राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांची भेट घेतली. त्यावेळी महाडिक यांनी सर्व बाबी विषयी सखोल माहिती जाणून घेत विमानसेवेचा मुद्दा संसदीय हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करेन, असे आश्वासित केली होती. महाडिक यांनी सोलापूर जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक साखर कारखाने आहेत. सुताचे कारखाने, उद्योग असून सोलापूर जिल्हा जगभर सोलापुरी चादर पुरविण्याचे काम करतो. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासाठी विमान सेवा गरजेची आहे. त्यामुळे होटगी रोड विमानतळावरून नागरी विमान सेवा सुरू करण्यात यावी. अशी मागणी राज्यसभेत केली. देशातील लहान शहरांना मोठ्या शहराची जोडणारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना असणारी उडान योजनेंतर्गत सोलापूर होटगी रोड विमानतळ विमानतळावरून नागरिक प्रवासी वाहतूक सुरू करण्यात यावी, असे यावेळी खा. महाडिक म्हणाले. सोलापूर विकास मंचच्या वतीने होटगी रोड विमानसेवा सुरू करण्याच्या मागणीसाठी गेल्या महिनाभर चक्री उपोषण करण्यात आले होते. दरम्यान, महाडिक हे कोल्हापूरचे खासदार असून त्यांनी सोलापूर विमानसेवेचा मुद्दा उपस्थित केल्याने शहातील व्यापाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



### ■ सोलापूरचे प्रतिनिधी गप्पच

खा. महाडिक यांनी सोलापूर विमानसेवेचा मुद्दा उपस्थित केला. मात्र सोलापूरचे लोकप्रतिनिधी या प्रश्नावर गप्प का असा प्रश्न आता व्यापारी आणि सोलापूरकर उपस्थित करत आहेत. विकासाच्या नावाखाली निवडून यायचे आणि नंतर मात्र त्यापासून फारकत घ्यायची असले काम सोलापूरचे प्रतिनिधी करत असल्याचे अनेक व्यापाऱ्यांनी बोलून दाखवले.

### ■ खा.महास्वामींकडून पालकमंत्र्यांची दिशाभूल : शहा

खा.धनंजय महाडिक हे कोल्हापूरचे आहेत. मात्र सोलापूर विमानतळा संदर्भात त्यांना आस्था आहे. ज्या तमाम सोलापूरकरांनी नरेंद्र मोदी यांच्या नावाखाली डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांना खासदार केले. ते मात्र सोलापूर होटगी रोड विमानतळ प्रश्नासंदर्भात मौन धारण करून शांत आहेत अनास्था दाखवत आहेत, अशी टिका सोलापूर विकास मंचचे केतन शहा यांनी केली. सोलापूर होटगी रोड विमानतळा संदर्भात मध्यंतरी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या सोबत झालेल्या बैठकीतही खा.डॉ. महास्वामी यांनी पालकमंत्र्यांची दिशाभूल केली. त्यामुळे त्या बैठकीत कोणताही निर्णय होऊ शकला नाही, असा आरोप ही शहा यांनी केला. मोदी यांनी सुरू केलेल्या उडान योजनेला खीळ घालण्याचे काम खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी हे करीत आहेत. ही बाब मतदार लक्षात ठेवतील, असेही ते म्हणाले.

# पीक विमा कुणासाठी?

राज्यात पीक विम्याच्या रकमांबाबत शेतकऱ्यांमधून प्रचंड ओरड सुरू आहे. कृषीमंत्री अब्दुल सत्तार सांगतात की, या रकमेपासून एकही शेतकरी वंचित राहणार नाही. तरी देखील पैसे मिळत नाहीत. आठ आणे शेतकऱ्यांकडून घेतले आणि चार आणे भरपाई म्हणून दिले. म्हणजे चार आण्याचा फायदा विमा कंपन्यांनी लाटला, असा अर्थ निघू शकतो. आठ आण्यातून एक रुपया मिळावा, असे शेतकऱ्यांना वाटते. हा व्यवहार खरा ठरतो पण विमा कंपन्याही आपला फायदा पहात आहेत. असे जर होत असेल तर विमा कंपन्या कुणासाठी? हा प्रश्न उपस्थित होणे साहजिकच आहे. महाराष्ट्रात १९९९पासून ते २०१६पर्यंत राष्ट्रीय पीक विमा योजना राबविण्यात येत होती. यात महत्त्वपूर्ण बदल करून खरीप २०१६पासून पंतप्रधान पीक विमा योजना राबविण्यास प्रारंभ झाला. शेतकऱ्यांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला पण पुढे पुढे कंपन्यांनी आपला नफा पाहायला सुरुवात केली. त्यामुळे शेतकरी उपेक्षित राहू लागला. या योजनेअंतर्गत विविध पिकांसाठी विमा संरक्षण दिले जाते. पण, या योजनेतूनही शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकलेला नाही. यंदा खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पीक विमा कंपन्यांकडून सढळ हाताने नुकसान भरपाईची अपेक्षा असताना कंपन्यांनी नुकसानग्रस्त १२ जिल्ह्यांतील सुमारे ५ लाखांवर शेतकऱ्यांच्या पूर्वसूचना अपात्र ठरवल्या. ४४ हजार शेतकऱ्यांना तर १ हजार रुपयांच्या आत म्हणजे जेवढा विमा हप्ता भरला, तेवढा परतावादेखील दिला नाही. नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागते. महापूर, चक्रीवादळे, गारपीट, अतिवृष्टी आदी नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांची अपरिमित हानी होते.



अशा संकटातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने पंतप्रधान पीक विमा योजना (पीएमएफबीवाय) सुरू केली. १३ जानेवारी २०१६ रोजी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला होता. या योजनेच्या अंतर्गत शेतकऱ्यांना खरीप पिकांसाठी २ टक्के प्रीमियम आणि रब्बी पिकांसाठी १.५ टक्के प्रीमियम भरावे लागते. सरासरी उत्पादन उंबरठा उत्पन्नापेक्षा कमी आल्यास शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळते. पंतप्रधान पीक विमा योजना ही सर्व शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पिकांच्या विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के रक्कम भरावी लागते. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे हा उद्देश आहे. पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत व्हावी यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. खरिपातील सर्व पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के निश्चित करण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड व रोग, वातावरणातील बदल यांसारख्या घटकांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत पीक विम्यापोटी जवळपास २ हजार कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. नुकसानीच्या तुलनेत ही रक्कम फार कमी असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. विमा योजनेत २०१६पासून २०२१पर्यंत शेतकऱ्यांनी ३ हजार २९३ कोटी रुपयांचा विमा हप्ता जमा केला. एकूण विमा २८ हजार ३६९ कोटी इतका होता, तर अंतरिम नुकसान भरपाई ही १९ हजार ४११ कोटी रुपये देण्यात आली. नुकसानभरपाईचे विमा हप्त्याशी असलेले प्रमाण केवळ ६९ टक्के आहे. यातून विमा कंपन्यांचा फायदाच झाल्याचे लक्षात येते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या १२ लाख २० हजार पूर्वसूचनांबाबत विमा कंपन्यांनी अद्याप भरपाई निश्चित केली नाही. नुकसानग्रस्त अनेक शेतकरी पूर्वसूचना दाखल करू शकले नाहीत. हे सर्व शेतकरी विमा भरपाईपासून वंचित राहण्याची भीती आहे. शेतकऱ्यांनी भरलेल्या रकमेच्या ९ ते १० पट रक्कम शासन हिस्सा म्हणून कंपनीला मिळालेले आहेत. अशा वेळी २५ टक्के, ५० टक्के नुकसान भरपाई म्हणून चार ते पाच हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात तर १ हजारांहूनही कमी रक्कम जमा झाली आहे. राज्यात यावर्षी खरीप हंगामात अतिवृष्टीने जवळपास ४० लाख हेक्टरवरील पिके नष्ट केली आहेत. मागील काही वर्षांपासूनच्या वाढत्या नैसर्गिक आपत्ती पाहता राज्यातील शेतकऱ्यांचा कल पीक विमा काढून आपली पिके संरक्षित करण्याकडे असतानाही योग्य परतावा मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

## सामाजिक

# वाढती लोकसंख्या आणि अन्न संकट

**वाढत्या लोकसंख्येमुळे जगभरात तेल, नैसर्गिक वायू, कोळसा इत्यादी ऊर्जा संसाधनांवर दबाव वाढला आहे, जे भविष्यासाठी मोठ्या धोक्याचे लक्षण आहे. भलेही आपण विकासाच्या फुशारक्या मारत राहिलो, पण सत्य हे आहे की जगभर भुकेचे गंभीर संकट उभे राहिले आहे. अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन म्हणतात की, 'अन्न समस्येचे मुख्य कारण केवळ अन्नपदार्थांची कमतरता नाही तर लोकांच्या क्रयशक्तीचा अभाव हे देखील आहे.' दुसरीकडे, एका अंदाजानुसार, संपूर्ण जगात तीस टक्के धान्य वाया जाते. शेतकरीही लोकसंख्येच्या प्रमाणात अन्नधान्य उत्पादन करू शकत नाही. महागाई वाढण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. अशा परिस्थितीत जगातील मोठ्या लोकसंख्येला उपासमारीतून बाहेर काढण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.**

जगाची लोकसंख्या आठ अब्जांच्या पुढे गेली आहे. अवघ्या तेवीस वर्षांच्या कालावधीत जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढली. येत्या काही दशकांमध्ये प्रादेशिक असमानतेसह लोकसंख्या वाढतच जाईल. संयुक्त राष्ट्रांच्या मते, ही लोकसंख्या २०३० पर्यंत ८.५ अब्ज, २०५० पर्यंत ९.७ अब्ज आणि २१०० पर्यंत १०.४ अब्जपर्यंत पोहोचू शकते. लोकसंख्येच्या बाबतीत भारत पुढील वर्षी चीनला मागे टाकेल. सर्वात जास्त लोकसंख्या असलेला तो नंबर एकचा देश बनेल. भारताची लोकसंख्या सध्या १.०४ टक्के वार्षिक दराने वाढत आहे. ज्या वेगाने लोकसंख्या वाढत आहे, त्या वेगाने येणाऱ्या काळात एवढ्या मोठ्या लोकसंख्येचे पोट कसे भरणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण हवामान बदलामुळे केवळ उपजीविका, पाणीपुरवठा आणि मानवी आरोग्य धोक्यात येत नाही, तर अन्नसुरक्षेलाही आव्हान निर्माण होत आहे. अन्नसुरक्षा हे जगातील अनेक देशांना आज भेडसावत असलेल्या सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक आहे.

आज जगाची लोकसंख्या जसजशी वाढत आहे, तसतसा नैसर्गिक साधनसंपत्तीवरही स्पष्टरित्या दबाव वाढत आहे. आज वाढती लोकसंख्या आणि कमी होत जाणारी संसाधने हा संपूर्ण जगासाठी शाप आहे, कारण लोकसंख्येच्या प्रमाणात संसाधने मर्यादित आहेत. त्यामुळेच सुमारे आठ अब्ज लोकसंख्येचा भार वाहणारी ही पृथ्वी लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांच्या निराकरणाच्या प्रतीक्षेत आहे. जगाच्या लोकसंख्येच्या ६१ टक्के लोकसंख्या एकट्या आशिया खंडामध्ये आहे. भारत जगाची महासत्ता होण्यात हाच सर्वात मोठा अडथळा आहे. सध्या भारताची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या अठरा टक्के आहे. प्रदेशाचा विचार करता आपल्याकडे २.५ टक्के जमीन आणि चार टक्के जलस्रोत आहेत. अशा परिस्थितीत झपाट्याने वाढणारी लोकसंख्या ही देशाच्या सामाजिक-आर्थिक समस्यांची जननी बनून देशासमोर धोक्याची घंटा बनू शकते. आज लोकसंख्या वाढ हे देशाच्या प्रत्येक समस्येचे मूळ बनत आहे.

गरिबी, उपासमार, बेरोजगारी, निरक्षरता, आरोग्य सेवा, गुन्हेगारी, शुद्ध पाण्याचा अभाव इत्यादींमागे लोकसंख्या वाढीचेही प्रमुख कारण आहे. एवढेच नाही तर देशातील ६० टक्के जमिनीवर शेती असूनही सुमारे २० कोटी लोक उपासमारीचे बळी आहेत. यावरून एक गोष्ट स्पष्ट आहे, लोकसंख्येच्या विस्फोटामुळे संसाधनांच्या अपुरेपणामुळे उद्भवलेल्या समस्या प्रत्येकाला प्रभावित करत आहेत. मग तो कोणत्याही धर्माचा असो अथवा जातीचा. सध्या भारताची लोकसंख्या १.३९ अब्ज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनींवरच अतिक्रमण होत आहे. लागवडीयोग्य जमीन कमी होत आहे, खाणारी तोंडे वाढत आहेत. अशा परिस्थितीत सर्वांना शेतीतून अन्न पुरवणे हे नवे आव्हान असेल. स्वातंत्र्यानंतर देश अन्नधान्याच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी होऊ शकला नाही, ही विडंबना आहे, पण आज शेतजमिनीच्या इतर वापरात झपाट्याने बदल होत आहेत, शेतकरी शेतीपासून दूर जात आहेत, यामुळे जी भारतात अन्न सुरक्षेची समस्या आहे. त्याचा धोका आणखी वाढू शकतो.




आणि पश्चिम बंगालमध्ये ६२,००० हेक्टर लागवडीयोग्य जमीन कमी झाली आहे. त्याच वेळी, उत्तर प्रदेश या सर्वाधिक लोकसंख्येच्या राज्यात हा आकडा सर्वात चिंताजनक वाटू शकतो, जिथे विकासकामांमुळे दरवर्षी अठ्ठेचाळीस हजार हेक्टर शेतजमीन कमी होत आहे. विशेष म्हणजे, १९९२ मध्ये ग्रामीण कुटुंबांकडे ११.७ कोटी हेक्टर जमीन होती, जी २०१३ पर्यंत घटून केवळ ९.२ कोटी हेक्टरवर आली. अवघ्या दोन दशकांत २.२ कोटी हेक्टर जमीन ग्रामीण कुटुंबांच्या हातातून निसटल्याचे स्पष्ट झाले आहे. हाच कल कायम राहिला तर पुढील वर्षापर्यंत भारतातील लागवडीखालील क्षेत्र केवळ आठ कोटी हेक्टर राहील, असे बोलले जात आहे.

लोकसंख्या नियंत्रणाच्या नावाखाली अनेक योजना सुरू केल्या गेल्या, पण त्या यशस्वी होऊ शकल्या नाहीत, हे खरे. लोकसंख्येसाठी राष्ट्रीय धोरण अत्यंत महत्त्वाचे आहे. वाढत्या लोकसंख्येचा देशाच्या विकासावर परिणाम होत आहे. योजनांचा लाभ मोठ्या लोकसंख्येपर्यंत समान प्रमाणात वितरित करणे शक्य होत नाही, त्यामुळे अनेक दशकांनंतरही आपण गरिबी, बेरोजगारी यांसारख्या समस्यांवर मात करू शकलो नाही. लोकसंख्या वाढली की मग गरिबांची संख्या वाढणे साहजिक आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२२ च्या अहवालानुसार भारतातील १६.३ टक्के लोकसंख्या कुपोषित आहे. पाच वर्षांखालील ३५.५ टक्के मुलांची वाढ खुंटलेली आहे. भारतात ३.३ टक्के मुलांचा पाच वर्षापूर्वी मृत्यू होतो. फूड अँड अॅग्रिकल्चर ऑर्गनायझेशन (FAO) च्या 'द स्टेट ऑफ फूड सिक्युरिटी अँड न्यूट्रिशन इन द वर्ल्ड' अहवालानुसार, जगभरात ८० कोटीहून अधिक लोक उपासमारीने त्रस्त आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, जगातील प्रत्येक दहावा माणूस भुकेलेला आहे. एवढेच नाही तर अजूनही सकस आहार हा जगभरातील ३१० कोटी लोकांच्या आवाक्याबाहेरचा आहे. हे स्पष्ट आहे की जगभरात संयुक्त राष्ट्रांचे सर्व कार्यक्रम आणि प्रयत्न असूनही अन्न विषमता आणि कुपोषण अद्याप नष्ट झालेले नाही. अन्न आणि कृषी संघटनेच्या मते, देशांमधील संघर्ष, हवामान बदल आणि आर्थिक मंदी हे याचे प्रमुख कारण आहे. कोरोना महामारीने ही दरी आणखी वाढवली आहे.

शेतजमिनींच्या ऱ्हासामुळे भारताच्या सामाजिक-आर्थिक जडणघडणीवरही परिणाम होत आहे. नापीक जमिनींचे लागवडीयोग्य जमिनीत रूपांतर करण्यात सरकारला काही प्रमाणात यश आले असले तरी, आपल्या देशातील शेतीयोग्य जमीन वर्षानुवर्षे कमी होत आहे, हेही वास्तव आहे.

'वेस्टलँड अॅटलस २०१९' नुसार, पंजाबसारख्या कृषी राज्यांमध्ये १४,००० हेक्टर

लोकसंख्या नियंत्रण आणि अन्नधान्य उत्पादनात वाढ याबाबत भारतच नव्हे तर संपूर्ण जगाने विचार करण्याची गरज आहे. या दोन्ही समस्या सोडवण्यासाठी जागतिक स्तरावर नावीन्यपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. भारत हा जगातील अशा देशांपैकी एक आहे जिथे अन्नधान्याचे दरडोई उत्पादन खूपच कमी आहे. येथे फक्त श्रीमंत मध्यमवर्गीय शेतकरी आणि व्यापाऱ्यांना पुरेसे आणि योग्य अन्न मिळू शकते. उर्वरित गावकरी, मजूर, छोटे शेतकरी, आदिवासी, मध्यमवर्गीय लोकांसमोर अन्नधान्याचा प्रश्न वाढत आहे. जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी पशुपालन आणि धान्याऐवजी भाजीपाल्यांचे उत्पादन आणि वापर हा असा उपाय आहे, ज्याच्या मदतीने हे उपाय बऱ्याच-याच अंशी शक्य आहेत. कुटुंब नियोजन आणि अन्नधान्य उत्पादनाचे कार्यक्रम सरकारने राबवले पाहिजेत.

**- मच्छिंद्र ऐनापुरे, जत जि. सांगली**

## टुडेज ब्लॉग

# ऊर्जेत परिपूर्ण होण्यासाठी सौर ऊर्जा अनिवार्य

**१४ डिसेंबर हा दिवस सर्व जगात 'ऊर्जा बचत दिन' म्हणून पाळला जातो. या निमित्ताने आपण वीज, निरनिराळी इंधने, कच्चे तेल आणि कोळसा याच्या बाबतीत विचार करतो. कारण मानवाचे जगणे सोपे व्हावे यासाठी विविध स्वरूपातल्या ऊर्जेची गरज असते.**

मुळात मानवाच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा होत्या पण आता आरोग्य, शिक्षण, प्रवास, एवढेच काय पण मोबाईल फोन याही मूलभूत गरजा बनल्या आहेत. यातली प्रत्येक गरज ही ऊर्जा साधनावर अवलंबून असते. माणसाचे जीवन जसजसे उन्नत होत चालले आहे तसतशी माणसाची ऊर्जेची गरज वाढत चालली आहे. कोणत्या ना कोणत्या स्वरूपातली ऊर्जा हाती असल्याशिवाय यातली कोणतीही गरज पूर्ण होऊ शकत नाही. उलट आज माणसाच्या राहणीमानाचा दर्जा मोजताना तो किती ऊर्जा वापरतो याचा विचार केला जातो. एवढेच नाही तर त्याचा ऊर्जेचा वापर वाढून त्याला अधिकाधिक सोयी मिळाव्यात अशी धडपड विविध देशातील सरकारे करत असतात. अर्थातच त्या बाबतीत अमेरिका जगाच्या पुढे आहे. तिथे केवळ मध्यमवर्गीयच नव्हे तर कनिष्ठ मध्यमवर्गीयांची घरे सुद्धा वातानुकूलित असतात. आता भारतीयांचे राहणीमान वेगाने वाढत चाललेले आहे.

भारतातल्याही कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये वातानुकूलित यंत्रणा ही सामान्य बाब झालेली आहे. विविध प्रकारची कार्यालये, हॉटेल आणि वाहने ही वातानुकूलित असणे जणू गरजच होऊन बसलेली आहे.



विविध कारखान्यांमधून ऊर्जा साधन म्हणून विजेचा वापर किफायतशीर झाल्यामुळे वाढला आहे. घरगुती कामातही वॉशिंग मशीन, मिक्सर अशा वस्तूंचा वापर वाढल्यामुळे घरगुती वीज वापर सुद्धा वाढला आहे. वीज ऊर्जेचे एक रूप आहे. इंधन तेले म्हणजे पेट्रोल आणि डिझेल यांच्या वापराला तर काही मर्यादाच राहिलेली नाही. भारतात स्वयंचलित वाहनांचा वापर वाढण्याचा वेग प्रचंड आहे. भारतातील मोटार कारची संख्या तीस कोटी झाली आहे. यावरून आपली ऊर्जेची गरज कशी वाढत चाललेली आहे याचा अंदाज येतो.


पृथ्वीच्या पोटातला कोळसा आणि डिझेल एके दिवशी संपणार आहे हे कोणाच्याच लक्षात येत नाही. या सगळ्या प्रकारावरून असे लक्षात येते की, आपल्याला आता अशा ऊर्जा साधनांचा शोध घ्यावा लागणार आहे की, जी ऊर्जा साधने कधीच संपणार नाहीत आणि ती साधने आहेत सूर्यप्रकाश आणि वारा. या दोन साधनांवर आधारलेली वीज आपण वापरायला लागलो तर आपल्याला वीज कमीत कमी पैशात आणि अव्याहतपणे उपलब्ध होणार आहे.

सध्या या दोन साधनांचा वापर होत आहे पण अजूनही या साधनांचे नियंत्रण सरकारकडे आहे. म्हणून ही नियंत्रणे हटून ही साधने मुक्त झाली पाहिजेत, तरच आपल्याला सहजतेने आणि विपुल वीज मिळू शकेल. जागतिक पातळीवर होणाऱ्या घडामोडींमुळे भारतासह प्रत्येक देश ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रयत्नशील आहे. पर्यावरण रक्षणासह गुंतवणुकीवर तब्बल २०-२५% परतावा मिळवून देणारे सौर ऊर्जा हे स्वच्छ आणि अविरत ऊर्जा स्रोत आहे. चला, तर आपण सर्व जण आपल्या घरावर सौर ऊर्जा सिस्टिम्स बसवून स्वच्छ ऊर्जेचा अवलंब करूयात आणि देशाच्या ऊर्जा संरक्षण कार्यात खारीचा वाटा उचलूयात.

**- संपतकुमार धूत.**

## जन्म हा अखेरचा

### धर्माचारस्थल - ४



तुम्हांला दुसऱ्याला कपडे वापरायला द्यायचे नसतील तर ते गाईच्या अंगावर टाकून स्वत: वापरावेत किंवा आधी देवाला अर्पण करुन मग वापरावेत. 'दान' हा धर्म आहे, तसाच तो व्यवहारदेखील आहे. जग म्हणजे देण्या-घेण्याचा बाजार होय. जगात तुम्ही कोणाला काही देणार नाही आणि दुसऱ्याकडून काही घेणार नाही तर व्यवहारच होणार नाही. श्वासोच्छ्वास करणे हे देखील एक प्रकारचे देणे-घेणेच आहे. तुम्ही नाकाने हवा आत घेतली आणि ती बाहेर सोडलीच नाही तर? तर मृत्यू पत्करावा लागेल. बाहेर हवा सोडल्यानंतर पुन्हा आत घेतली नाही तरीदेखील मरावेच लागेल.

ईश्वर देतो आणि घेतो. तो एका हाताने देतो तर दुसऱ्या हाताने घेतो. हे जग म्हणजे त्यानेच आपल्याला बहाल केलेले वैभव आहे. ईश्वर आधी देतो मग मागतो. मनुष्य मात्र आधी मागतो मग देतो. तर कधी देत देखील नाही. ईश्वर तुम्हांला देतो खूप, पण मागतो कमी. आपल्या कमाईतला दहावा हिस्सा धर्मासाठी खर्च करावा, असे शास्त्र सांगते. धर्म हा ईश्वर मानला तर - कारण धर्म हा ईश्वरच होय. तो तुम्हांला शंभरपट देतो आणि त्यातले फक्त दहापट मागतो. म्हणून आपल्या कमाईतला दहावा भाग धर्मासाठी खर्च करावा. दान केल्याशिवाय कलियुगात धर्मपालन होत नाही. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

# महाराष्ट्राचे वाल्मीकी 'गदिमा'

जनमानस

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ गदिमा यांची आज पुण्यतिथी. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले. त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि. स. खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरुवात केले. 'भक्त दामाजी, पहिला पाळणा, लोकशाहीर 'रामजोशी' या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली. इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते 'चैत्रबन' ह्या नावाने संग्रहित आहे. गदिमांच्या कवितेवर



ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना 'महाराष्ट्र वाल्मिकी' ही पदवी दिली. त्यांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. 'प्यासा, अवतार, ब्लॅक' या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. ४ दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

# चीनला कायमची अद्दल घडवावी

**अरुणाचल प्रदेश राज्यातील तवांगच्या यांगत्से सीमाभागात चिनी सैनिकांशी गेल्या शुक्रवारी (९ डिसेंबर) झालेल्या चकमकीत अनेक भारतीय जवान जखमी झाल्याचे वृत्त आहे. चीनच्या 'पीपल्स लिबरेशन आर्मी'चे सैनिक आणि भारतीय जवानांमध्ये चकमक झडल्याच्या वृत्ताला संरक्षण दलातील अधिकाऱ्याने दुजोरा दिला असला तरी त्याबाबतचा तपशील देण्यास मात्र त्याने नकार दिला. चकमकीत भारतीय जवानांपेक्षा चीनचे सैनिकच अधिक जखमी झाले आहेत, असा दावा या अधिकाऱ्याने केला. चकमकीत काही भारतीय जवानांच्या हाता-पायांना गंभीर जखमा झाल्या असून त्यांच्यावर गुवाहाटी येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे सांगितले जाते. भारतीय जवानांची ६०० चिनी सैनिकांशी चकमक झाली, असे सूत्रांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर चीनची वर्तमान स्थिती, त्यांच्या कुरापती यांविषयी जाणून घेऊया.**

चीनच्या विद्यमान सरकारला देशांतर्गत विरोध प्रचंड वाढत आहे. सक्तीचे लॉकडाऊन हे यामागील मुख्य कारण आहे. असे असूनही भारताच्या कुरापती काढण्याची त्यांची जुनी खोड कायम आहे. 'जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही' असे म्हणतात तसेच चीनचे आहे. यातील लक्षवेधी सूत्र म्हणजे चीनच्या बऱ्याच प्रांतात कोरोनाचा उद्रेक चालू आहे. त्याला अटकाव करण्यासाठी तिथे 'झिरो कोविड पॉलिसी' राबवताना लोकांवर सरकारकडून अमानुषपणे अत्याचार केले जात आहेत. अर्थात चिनी सैनिक जे नियंत्रण सीमेवर भारतीय सैनिकांशी झटापटी करत आहेत तेही त्यांच्या देशातील कुठल्यातरी भागातून आलेले असणार आहेत. ज्या देशात आजही कोविडचा मोठ्या प्रमाणावर संसर्ग आहे, त्या देशाचे सैनिक भारतीय सैनिकांसह झटापटी करून त्या भागातील भारतीय सैनिकांत कोविडचा फैलाव करू इच्छित नसतील हे कशावरून? कारण तो चीन आहे. याविषयी भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर आवाज उठवला पाहिजे आणि चीनची मस्ती उतरवली पाहिजे. बाह्यतः दिसताना चीनची घुसखोरी दिसते. पण ज्यांनी जगाला कोविडमुळे वेठीस धरले त्यांचे भारताविरुद्धचे मत कधीच चांगले असूच शकत नाही. भारतात सर्व सुरळीत चाललेले पाहून पोटशूळ उठणार नाही मग तो चीन कुठला? भारतात कोविड पूर्णतः नियंत्रणात आहे. त्यामुळे सर्वकाही आलबेल आहे. जागतिक अर्थव्यवस्था गटांगळ्या खात असताना भारताची अर्थव्यवस्था मात्र स्थिर आहे. उलटपक्षी त्यात आणखी वाढच होणार आहे. हे जागतिक स्तरावरील अर्थतज्ञ सांगत आहेत. चीनच्या हे नक्कीच डोळ्यात खुपत असणार आहे. त्यामुळे नियंत्रण रेषेवर कुरापती काढण्याचे हुकमी अस्त्र चीन चालवत आहे. विस्तारवादी चीनला विस्तार करण्याच्या भूमिकेपुढे ना त्यांचे सैनिक प्रिय ना जनता. त्यांचा खेळण्यातील खेळण्यांप्रमाणे उपयोग होत आहे. त्यामुळेच चीनमध्ये कोविडचा फैलाव असूनही चिनी सैन्याला भारतीय सैनिकांविरुद्ध चिथावून संघर्ष करण्यासाठी भाग पाडले जात आहे का? याची भारतीय गुप्तहेर खात्याकडून माहिती घ्यावी लागेल.




दुसरे सूत्र असे की, 'अरुणाचल प्रदेशापासून लडाखपर्यंतच्या सीमावर्ती भागांत चीनने पुष्कळ मोठ्या प्रमाणात सुविधा निर्माण केल्या आहेत. भारतही त्यात मागे नाही. पण तुलनेत भारत त्यांच्या इतका वेग गाठण्यात मागे राहिला हे मान्य करावे लागेल. म्हणजे चीनच्या आधी सुविधा निर्माण कराव्यात एका बाजूला वेगाने पायाभूत सुविधा चीनने निर्माण केल्या आणि त्याच वेळी भारताच्या कुरापती काढणेसुद्धा चालू ठेवले. दुसऱ्याचे हिसकावून घेत ते आपल्या नावे करणे आणि त्याला तिथून हाकलून देणे ही भारतीय सभ्यता, संस्कृती नाही. त्यामुळे भारतीय सैनिक चुकूनही आपल्या कुरापती काढण्यासाठी येणार नाहीत याची चीनला खात्री आहे. तसेच भारत आपल्याशी उघड युद्ध करणार नाही. त्यामुळे त्याची ताकद अनुभवण्यासाठीही त्याला अधूनमधून डिवचून पाहिले जाते. पण प्रत्येक वेळी त्यांना चोख उत्तर मिळाल्याने त्यांची डाळ शिजत नाही. काँग्रेस पक्षाचे महासचिव जयराम रमेश यांनी केलेल्या आरोपानुसार 'उत्तर लडाखमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चीनने डेपसांगमध्ये एलएसीच्या सीमेपासून १५ ते १८ किलोमीटर आतपर्यंत २०० ठिकाणी तळ ठोकला आहे. मात्र, सरकार यावर गप्प आहे. आता हे प्रकरण अधिक चिंताजनक झाले आहे.' यातील तथ्य पडताळून पाहिले पाहिजे. राजकीय आरोप प्रत्यारोप चालूच असतात. त्याशिवाय राजकारण नाही. शाब्दिक चकमकी झोडणे, ट्विटरवर टिवटिव करणे या पलिकडे राजकीय मंडळी जात नाहीत. प्रत्यक्ष नियंत्रण सीमेवर सैनिकांनाच शत्रूशी संघर्ष करावा लागतो. हे माहीत असूनही आवश्यक तेवढेच बोलणे भारतीय राजकारणाला मान्य नाही. दोघांचे भांडण आणि तिसऱ्याचा लाभ. म्हणजे चीनसारख्या धूर्त देशाचा. असे होत नाही ना? याकडे कोणाचे लक्ष आहे असे वाटत नाही. 'आपले सैन्य भारतीय सैनिकांवर चाल करून गेल्यास देशातील राजकीय वातावरण गरम होईल आणि त्यामुळे राजकीय वादविवाद चालू होतील. परिणामी चीनविरुद्ध देशातून उठाव झाला तरी आजमितीस अचानकपणे चिनी मालावर १०० टक्के बहिष्कार टाकणे शक्य नाही. कारण त्यानंतर तोंड द्याव्या लागणाऱ्या भीषण व्यावसायिक अडचणींना सामोरे जाण्याची भारताची सिद्धता नाही. तसेच आपल्या मालावर बहिष्कार हे सूत्र तात्पुरते असते. काही दिवसांनी भारतीय लोक पुन्हा चिनी मालाकडे वळतात. कारण त्याची सवय अंगवळणी पडली आहे' हे चीन उत्तमप्रकारे जाणून आहे. चीनच्या आर्थिक नाड्या आवळताना भारताचे हात दगडाखाली आहेत. हे भारतही जाणून आहे. चीनला व्यावसायिक स्तरावर धडा शिकवण्यासाठी भारतालाही त्याचतोडीची किंबहुना त्याहीपेक्षा सर्वोत्तम अशी व्यवस्था करावी लागणार आहे. या सर्व गोष्टी तातडीने अशक्य नाही. इतके आपण चीनवर अवलंबून आहोत. **- जयेश राणे, मुंबई.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## बालाजी अमाईन्स महिला टेनिस स्पर्धेत ईश्वरीचे यश

**सोलापूर** : महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत बालाजी अमाईन्स सोलापूर ओपन २५०००डॉलर महिला टेनिस स्पर्धेत भारताच्या वाईल्ड कार्ड प्राप्त ईश्वरी मातेरेने फेड कूपर रिया भाटियाचा पराभव करत इतर तीन भारतीय खेळाडूंसह दुस-या फेरीत प्रवेश केला. सोलापूरच्या प्रार्थना ठोंबरे हिने दुहेरीत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला. एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे सूरू असलेल्या या स्पर्धेत पुण्याच्या आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी करत रिया भाटियाचा ३ तास १७ मिनीट चाललेल्या संघर्षपुर्ण लढतीत ७-६(५), २-६, ७-६(१२) असा पराभव केला. तिस-या सेटमध्ये २-६ असे पिछाडीवर असताना रोमहर्षक टायब्रेकमध्ये १४-१२ असा विजय मिळवत पहिला डब्ल्यूटीए पॉइंट प्राप्त केला.वाईल्ड कार्ड प्राप्त भारताच्या संजना सिरिमल्लाने जेनिफर लुइखमचा ६-४, ७-६(५) असा टायब्रेकमध्ये पराभव करत दुसरी फेरी गाठली. रशियाच्या बिगर मानांकित डारिया कुडाशोवाने लातवियाच्या चौथ्या मानांकित डायना मार्सिन्केविकाचा ६-२, ७-५ असा पराभव करत दुस-या फेरीत धडक मारली. भारताच्या सहज यमलापल्लीने वैष्णवी आडकरचा ६-१, ४-६, ६-४ असा तर झिल देसाईने शर्मदा बाळूचा ६-४,६-१ असा पराभव करत दुस-या फेरीत प्रवेश केला.

## प्रशिक्षणासाठी सीईओ स्वामी रजेवर

**सोलापूर** : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी प्रशिक्षणासाठी एक महिना रजेवर जाणार असल्याने त्यांचा पदभार प्रशिक्षणार्थी आयएएस मनीषा आव्हाळे यांच्याकडे देण्यात येणार असल्याची चर्चा होत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना आयएएसचे प्रमोशन यापूर्वीच मिळाल्याने प्रशिक्षणासाठी त्यांची निवड झाली आहे. प्रशिक्षणाला जाण्यासाठी ते एक महिना रजेवर जाणार आहेत. त्यामुळे त्यांचा पदभार सोलापूर विभागाचे प्रांताधिकारी मनीषा आव्हाळे यांच्याकडे देण्यात येणार असल्याचे चर्चा होत आहे. मनीषा आव्हाळे यांनी मात्र अद्याप आपल्याला तसा आदेश आला नसल्याचे स्पष्ट केले. झेडपीचा पदभार थेट आयएएस असलेल्या अधिकाऱ्याकडे जाणार असल्याने दांडीबहाद्दरांची आता पाचावर धारण बसली आहे. कार्यालयाला दांडी मारणारे अधिकारी व कामचुकार, कर्मचारी धावत पळत कार्यालयात जाताना दिसत होते.



## शालेय सेपक टकरा स्पर्धेत स.हि.ने प्रशालेचे चार खेळाडूंची निवड

**सोलापूर** : मंगळवेढा येथे होणाऱ्या पुणे विभागीय सेपक टकरा स्पर्धेसाठी स.हि.ने प्रशालेच्या चार खेळाडूंची निवड झाली आहे. महापालिकेच्या क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या शालेय शहरस्तर स्पर्धेत स.हि.ने. प्रशालेने यश मिळवले असून चार खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे १९ वर्षाखालील मुलांच्या गटात स. हि. ने प्रशालेने पंचशील प्रशालेचा २१ -१९ असा पराभव केला नववी अ मध्ये शिकत असलेला सोहम देशपांडे, साईराम भंडारे, इम्रान पठाण यांनी डोक्याने व पायाने बॉल मारत शेवटच्या क्षणी दोन गुण घेऊन विजय मिळवून दिला १% वर्षाखालील मुलांच्या गटात सहिने प्रशालने यश मिळवले आहे ओसामा सय्यद, अमित पाडवी, यश भोसले, यज्ञेश जोशी यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश मिळवून दिले. सोहम सपार, अथर्व गुंडूप यांनी सहभाग नोंदवाला क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी यांचे मार्गदर्शन लाभले संस्थेचे अध्यक्ष शिरीष तुळजापूरकर, सचिव किरण करकमकर, सचिव सदस्य मोहन दाते, पांडुरंग देशमुख, रघुनाथ दामले, रेवती कुलकर्णी, प्रीती चिलजवार, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, पर्यवेक्षक शीला देव यांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त

### बाबू मुत्तवली



**सुराज्य/अक्कलकोट:** अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळ येथील ग्रामदैवत शेख बाबा ट्रस्टचे चेअरमन कै. बाबू दाऊद मुत्तवली यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते पानमंगरुळ ग्रामपंचायतीचे लिपिक दाऊद मुत्तवली यांचे वडील होत.

### सतिश होनभाकरे



**सुराज्य/सोलापूर** : सतिश होनभाकरे (वय ४८) यांचे १३ डिसेंबर रोजी संध्याकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात, पत्नी, मुलगा, मुलगी आणि जावई असा परिवार आहे.

### संजय नवगिरे



**उत्तर सोलापूर** : उतर तालुयातील गुळवंची येथील संजय मुरलीधर नवगिरे (वय ५०) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी आहेत. संजय नवगिरे हे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तोलार म्हणून काम करत होते.

### जनाबाई आसबे



**सोलापूर** : दमानी नगर गडदर्शन सोसायटी येथील रहिवाशी श्रीमती जनाबाई शंकर आसबे (वय ७३) यांचे मंगळवारी दुपारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी कोयना नगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

### सोलापूर बंद वरून मतभेद

# हिंमत असेल तर स्वतःच्या अजेंड्यावर सोलापूर बंद करून दाखवा

### ▪ भाजप-शिंदे गट-मनसे नेत्यांचे आव्हान

**सोलापूर** : महापुरुषाच्या अवामानाच्या निषेधार्थ १६ डिसेंबर रोजी सोलापूर बंदी मध्ये निर्माण मतभेद निर्माण झाले आहेत महाविकास आघाडीला स्वतःचा अजेंडा नसल्यामुळे शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या मंडळाचा वापर करत आपल्या नेत्यांना खुश करण्यासाठी सोलापूर बंदचा नारा दिला आहे.



त्यामुळे सोलापूर बंदला आमचा पाठिंबा नाही असे बाळासाहेबांची शिवसेना भारतीय जनता पार्टी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संयुक्त पत्रकार परिषद जाहीर केले हिंमत असेल तर स्वतःच्या अजेंडा वर सोलापूर बंद करून दाखवा असा इशारा देखील सोलापूर बंदचा नारा देणाऱ्या महाविकास आघाडीतील नेते मंडळींना दिला

छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील. महात्मा ज्योतिबा फुले सावित्री फुले यांच्या बाबत अवमानकारक वक्तव्य केले जात आहे. याच्या निषेधार्थ शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने सर्वपक्षीय सर्व धर्मीय १६ डिसेंबर रोजी सोलापूर बंदची हाक दिली आहे. आता या सोलापूर बंद वरुन मतभेद निर्माण झाले आहेत बाळासाहेबांची शिवसेना भारतीय जनता पार्टी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या बंदला विरोध असून या बंदमध्ये आम्ही सहभागी होणार नाही असे सांगत या बंदमध्ये कोणीही सहभागी होऊ नये असे बाळासाहेब शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, दिलीप कोल्हे, भारतीय जनता पार्टीचे अनंत जाधव, श्रीकांत घाडगे ,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रशांत इंगळे, विनायक महिंद्रकर यांनी केले आहे आहे. ज्यांच्याकडून महापुरुषाचा अनादर झाला त्या लोकांचा जाहीर निषेधच आहे. मात्र अवमान कारक ज्यांनी वक्तव्य केली त्यांनी आता दिलगिरी व्यक्त केली आहे माफी मागितली आहे मात्र काही राजकीय पक्ष काही संघटना अस्मितेचा विषय करून महाराष्ट्रासह सोलापूरची शांतता भंग करण्याचा हा प्रयत्न जात आहे राजकीय फायद्यासाठी महापुरुषांच्या नावाचा आधार घेऊन आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी सोलापूर बंदची हाक दिली गेली आहे.

राजकारणापोटी हा सोलापूर बंद केला जात आहे आपल्या नेते मंडळींना खुश करण्यासाठी शहरातील राजकीय मंडळी हा बंद यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत हा बंद शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या माध्यमातून घोषित केला. मंडळाच्या माध्यमातून महाविकास छुपा अजेंडा वापरत असल्याचा आरोप यावेळी या संयुक्त पत्रकार परिषदेत केला.

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळामध्ये अनेक मोठ मोठे मंडळे सहभागी होतात या मंडळावर सर्वांचा अधिकार आहे महा विकास आघाडीचा अजेंडा वापरून सोलापूर बंद करून दाखवा मध्य मध्यवर्ती महामंडळाचा वापर राजकीय पक्षाच्या स्वार्थासाठी करु नये

**- अमोल शिंदे (जिल्हाप्रमुख बाळासाहेबांची शिवसेना)**

शिवजन्मोत्सव महामंडळाची स्थापना माझ्या वडिलांनी केली मात्र या मंडळाचा राजकीय वापर कधीच केला गेला नाही मी या मंडळाचा सदस्य आहे या मंडळाचा राजकीय राजकीय फायद्यासाठी वापर करणे चुकीचे आहे याला आमचा विरोधच आहे

**- श्रीकांत घाडगे (भाजपा)**

महापुरुषा आम्हाला आदर आहे. मात्र मध्यवर्ती महामंडळाच्या खांद्यावर बंदूक ठेवून महाआघाडीतील नेतेमंडळी शिवभक्त आणि भीमसैनिकांची माथी भडकावत आहेत याला आमचा विरोध आहे या बंदमुळे मोठे आर्थिक नुकसान होणार आह महामंडळाच्या माध्यमातून आपली राजकीय पोळी कोणालाही भाजू देऊ देणार नाही

**- प्रशांत इंगळे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)**

अवमान प्रकरणी आम्ही आमच्या पातळीवर निषेध नोंदवला आहे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आणि पक्ष पातळीकडे या संदर्भात नाराजी व्यक्त केली आहे. सोलापूरला वेठीस धरणे योग्य नाही.

**- अनंत जाधव (भाजप)**

---

## दुहेरी जलवाहिनीचे १८ किलोमीटरचे काम पूर्ण

### आयुक्तांनी घेतली आढावा बैठक

**सुराज्य/सोलापूर**



उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनी जलवाहिनी टाकण्याचे काम रस्त्याच्या उजव्या बाजूने करण्यात येत आहे. हे काम सुरू करण्यात आले.

एकूण ११० किलोमीटर पैकी आत्तापर्यंत १८.२० किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. दर पंधरा दिवसाला या कामाचा आढावा घेण्यात येणार आहे. वेळेत हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचेही महापालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी सांगितले.

आयुक्तांनी उजनीच्या दुहेरी जलवाहिनीच्या कामाचा आढावा घेतला आहे, त्यानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या. दरम्यान, भोगाव येथील कचरा डेपो येथे बायोमायनिंगचे काम निविदा प्रक्रियेत आहे. त्यानंतर येथील कचऱ्याचे वर्गीकरण करण्यात येणार आहे. त्यानंतर शेवटी अनावश्यक मटेरियल खड्डयात गाढण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

> **घंटागाडीचे काम डबल शिफ्टमध्ये?**
>
> सोलापूर शहरातील कचरा संकलनासाठी घंटागाडीचे काम डबल शिफ्ट मध्ये करण्याचा विचार सुरू आहे. त्या संदर्भात आढावा घेण्यात आला असल्याचे महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी सांगितले.

## शहरातील कचराकुंडीत नवजात अर्भक सापडले

**सोलापूर** : छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयासमोरील कचरा कुंडी जवळ एका नवजात अर्भकाचा मृतदेह बेवारस अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

सकाळी १० वाजेच्या सुमारास एक माहिला कचरा कुंडीजवळ भंगार साहित्य गोळा करीत होती. त्यावेळी तिला एका प्लास्टिकच्या पिशवीत कापडात गुंडाळलेले अर्भक मृत अवस्थेत आढळले.

हे नवजात नवजात अर्भक पुरुष जातीचे आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयाकडे उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. या घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.

## दिल्ली येथील युनिव्हर्सिटीकडून उद्योजक मनोज कदम डॉक्टरेटने सन्मानित

**सुराज्य/सोलापूर**



सोलापूर जिल्ह्यातील अकुंभे गावचे भूमिपुत्र एस व्ही ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे चेअरमन व प्रसिद्ध उद्योजक डॉ. मनोज कदम यांना दिल्ली येथील युनिव्हर्सिटीने त्यांच्या उद्योजकता विकास, औद्योगिक प्रकल्प आणि सामाजिक कार्य या क्षेत्रांतील विशेष योगदानाबद्दल दखल घेऊन मानद डॉक्टरेट देऊन दिल्ली येथे प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत दि.९ डिसेंबर रोजी कार्यक्रमात सन्मानित केले.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण करून आणि मेहनतीने पुढे जाऊन स्वतःचे वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यवसाय मोठे करत अतानाच सोबत तरुणांना उद्योजक बनवून यशस्वी मोठे करण्यात त्यांचा खूप मोठा वाटा आहे. कामावरील चिकाटीनं त्यांनी वयाच्या ३२ व्या वर्षी एका मोठ्या अमेरिकन कंपनीचा जनरल मॅनेजर म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये महत्वाच्या पदांवर काम केले. ९ वर्षांपूर्वी लाखो रुपये पगाराची नोकरी सोडून व विदेशात जाण्याची विनंती धुडकावून आपल्या देशासाठी काही करण्याच्या एकमेव ध्यासाने ते भारतातच राहिले आणि स्वतःचा व्यवसाय सुरु करून उत्कृष्ट प्रकल्प उभारणीसाठी कन्सल्टन्सी हा व्यवसाय आणि सोबत समाजसेवा शेकडो लोकांना रोजगार आणि त्यांनी अनेक प्रकल्प त्यांच्या एस.व्ही इंजिनिअरिंग अँड कन्सल्टन्सी सर्व्हीसेसच्या माध्यमातून उभे केले आहेत. लवकरच त्यांचा ग्लोबल आडगाव नावाचा ६०० पेक्षा जास्त कलाकार असणारा जबरदस्त मराठी चित्रपट आपल्या समोर लवकरच येत आहे.वेगवेगळ्या उद्योग क्षेत्रात आपले नावलौकिक संपादन यशस्वी उद्योजक असणारे सर्वसामान्य वाटणारे असामान्य व्यक्तिमत्व म्हणजे उद्योजक मनोज कदम. त्यांचे उद्योजकता विकास, औद्योगिक, प्रदूषण नियंत्रण, ऊर्जाबचत आणि सामाजिक कार्य यातील विशेष योगदान पाहून त्यांना दिल्ली येतील आर्ट अँड मॅजिक युनिव्हर्सिटी तर्फे उद्योजक घडविणारे उद्योजक डॉ.मनोज कदम मानद डॉक्टरेट देऊन सन्मानित करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

हा सन्मान मिळाला म्हणून त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक आणि अभिनंदन केले. यामुळे आमची जबाबदारी अजून जास्त वाढली असून पुढील कार्यास प्रेरणा मिळाली आहे असे मत डॉ.मनोज कदम यांनी व्यक्त केले. हा सन्मान मिळाल्याबद्दल मनोज कदम यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## चार पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या

**सुराज्य/सोलापूर**

शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत असलेल्या चार पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. तशी ऑर्डर पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी मंगळवारी काढली.बदल्या करण्यात आलेल्या पोलीस निरीक्षकांमध्ये राजेंद्र करणकोट,अश्विनी भोसले, शिवाजी राऊत व राघवेंद्रसिंह क्षीरसागर यांचा समावेश आहे.राजेंद्र करणकोट यांची जेलरोड पोलीस स्टेशन इथून जोडभावी पोलीस ठाणे येथे बदली करण्यात आली.

शिवाजी राऊत यांची जोडभावी पेठ पोलीस ठाण्यातून येथून सुरक्षा शाखेत बदली करण्यात आली आहे.सदर बाजार पोलीस ठाण्याच्या निरीक्षक अश्विनी भोसले यांची विशेष शाखेमध्ये बदली करण्यात आली आहे.तर राघवेंद्रसिंह क्षीरसागर यांची बदली विशेष शाखेतून सदर बजार पोलीस ठाण्यामध्ये करण्यात आले आहे.

> **दुरूस्ती...**
>
> मंगळवार दि. १३ डिसेंबरच्या दै.सुराज्यच्या अंकात पान ३ वर महावितरणच्या बातमीतील चौकटीतला मजकूर कॉपीपेस्ट करताना संदर्भ बदलला गेला आहे. त्याविषयीची ही दुरूस्ती दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये ११/१६ केवी ट्रान्सपोर्ट बद्दल अनेक तक्रारी आले असून त्यावर संबंधित ठेकेदार यांना लेखी तोंडी व प्रत्यक्ष दूरध्वनी संपर्क साधला असता संबधित ठेकेदार हे लवकरात लवकर डी.पी.दुरुस्त देतो सांगितले आहे. तरी देखील संबंधित ठेकेदार हे दोन ते तीन दिवसात डी.पी दुरुस्त होईल असे सांगितले. यासंदर्भात आम्ही दक्षिण सोलापूर तालुक्यातील डी.पीच्या संदर्भात वरिष्ठाकडे लेखी पत्राद्वारे कळविले आहे.
>
> **- संदीप पाटील, उपकार्यकारी अभियंता दक्षिण सोलापूर**
>
> **अभियंत्यांनी सांगितलेली बाजू अशी वाचावी...**

# राहुल गांधी झोपडपट्टी येथे तलवारीने मारहाण; दोघे जखमी

**सुराज्य/सोलापूर**

आपल्याकडे रागाने का बघतोस याचा जाब विचारले असता तलवार आणि काठीने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना राहुल गांधी झोपडपट्टी परिसरातील पालिकेच्या कोंडवाड्याजवळ मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. जाफर माजीदसाब कुरेशी (वय २३ रा. दक्षिण सदर बजार) आणि हनिफ महंमदसाब कुरेशी (वय २२ रा.मुल्लाबाबा टेकडी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. आज दुपारी बारा वाजेच्या सुमारास त्यांना अब्दुल रहीम कुरेशी, शोएब उर्फ बाबू कुरेशी आणि अरबाज कुरेशी या तिघांनी तलवार आणि काठीने मारहाण केली. अशी नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.




### डुक्कर आडवा आलेल्या जखमी दुचाकी चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर** : दुचाकीवरून प्रवास करताना डुक्कर आडवा घेऊन दोघेजण जखमी झाले होते.त्यापैकी एकाचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी सकाळी मरण पावला पावला. दशरथ आनंदराव वडतिले (वय ५५ रा. बोरामणी नाका सोलापूर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. ते ४ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास सिद्धेश्वर दत्तात्रय गायकवाड (वय ५२ रा.बोरामणी नाका सोलापूर) याच्या दुचाकी पाठीमागे बसून मोहोळ न्यायालयासमोरून जात होते. डुक्कर आडवा आल्याने दोघेही दुचाकीवरून कोसळून जखमी झाले होते. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले होते. त्यापैकी दशरथ गायकवाड हे मरण पावले. अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली.

### माकड चावल्याने शेतकरी जखमी

**सोलापूर** : हत्तुर (ता.दक्षिण सोलापूर) येथे शेतात पिकांना पाणी देत असताना अचानक माकडाने हल्ला करून चावा घेतल्याने शेतकरी जखमी झाले. ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास हत्तुर (ता.दक्षिण सोलापूर) येथे घडली. अमोगसिद्ध उमाकांत नारायणे (वय २९ रा. हत्तुर असे जखमीचे नाव आहे. दुपारी एक वाजेच्या सुमारास माकडाने त्यांच्या डाव्या हाताला चावा घेतला.त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलीस झाली आहे.

### कुर्डवाडी येथे रेल्वेच्या धडकेने महिला जखमी

कुर्डूवाडी येथे रेल्वेच्या धडकेने अंजना संतोष गायकवाड (वय ३६ रा. सुगाव ता. इंदापूर जि.पुणे) ही महिला जखमी झाली.ही घटना आज मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली. अंजना गायकवाड हिच्या डोक्यावर परिणाम झाला असून ती कुर्डूवाडी येथे माहेरी आली होती. पहाटेच्या सुमारास ती घरातून बाहेर पडली. त्यावेळी हा प्रकार घडला. कुर्डूवाडी येथे प्राथमिक उपचार करून आनंद रिकिबे (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

### देवस्थानच्या ट्रस्टी वरून मारहाण; दोघा जणांवर गुन्हा

सोलापूर-कासेगाव (ता.पंढरपूर) येथील श्री वेंकटेश देवस्थानच्या विश्वस्त पदाच्या वादातून घरात घुसून मारहाण केल्याची घटना पंढरपूर येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली.या प्रकरणात पंढरपूर शहरच्या पोलिसांनी एका महिलेसह दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. यासंदर्भात दीपक उर्फ विक्रम वासुदेव वाडदेकर (वय ४९ रा.भक्ती मार्ग पंढरपूर) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अमर उर्फ पिंटू औदुंबर आराध्ये आणि सुनंदा औदुंबर आराध्ये (रा.भक्ती मार्ग पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. सोमवारी दुपारच्या सुमारास दोघेजण घरात आले. कासेगाव येथील देवस्थानचे मला अध्यक्षपद नको. त्याच्या बदल्यात पैसे द्या. असे म्हणत त्यांनी धक्काबुक्की करून धमकी दिली.असे वाडेकर यांच्या फिर्यादीत नमूद आहे. सहाय्यक निरीक्षक सोनकांबळे पुढील तपास करीत आहेत.




## मुंडे यांची जयंती अक्कलकोट येथे साजरी

सुराज्य/अक्कलकोट : गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान शाखा अक्कलकोट यांच्यावतीने लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम नवीन राजवाड्यासमोर तानवडे शॉपिंग सेंटर अक्कलकोट येथे पार पडला. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी पक्ष नेते भाजप (जि. प. सदस्य) आनंद तानवडे हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून पालापुरचे सरपंच शेखप्पा कलकुटगे होते. सुरुवातीला गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पन करून पूजन करण्यात आले. प्रास्ताविक आनंद तानवडे यांनी केले तसेच मुंडे यांच्या आठवणींना व त्यांच्या जीवन कार्याविषयी उजाळा दिला. त्यानंतर गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्राध्यापक परमेश्वर आरबळे यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले कि, 'मुंडे साहेबांच्या विचारांनी आपल्याला स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आणि वारसा दिलेला आहे तो पुढे चालवण्याचं काम आपण करूया असे बोलून त्यांच्या कार्याच्या आठवणी जाग्या केल्या. याप्रसंगी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान शाखा अक्कलकोटच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्राध्यापक परमेश्वर आरबळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच याप्रसंगी अक्कलकोट भाजपा शहर कार्यकर्ता मनोज जाधव (फुटाणे), बादोला ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल कत्ते, सांगवी खुर्द (कोळी बेट), ग्रामपंचायत सदस्य मल्लिकार्जुन पारशेट्टी, शिरवळ ग्रामपंचायत बिनविरोध सदस्य राजकुमार पाताळे, मीडिया प्रमुख मशाक मुल्ला, मायक्रोस्टार कम्प्युटरचे संचालक इब्राहिम कारंजे उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सामाजिक कार्यकर्ते नवनाथ धस यांनी केले.



## जिजाऊच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

सुराज्य/उत्तर सोलापूर : युवक संचलनालय पुणे विभाग यांच्यावतीने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल, राजर्षी शाहू महाराज माध्यमिक विद्यालय आणि विजयसिंह मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालय कोंडी येथील विद्यार्थ्यांनी वडाळा येथील तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये यश संपादन केले आहे. १९ वर्षे वयोगटामध्ये ४.९० मीटर गोळा फेक, १३. २० मीटर थाळीफेक स्पर्धेमध्ये समीक्षा शिंदे-प्रथम, १४-वयोगट-५.८३ गोळा फेक-आकांशा शिंदे-प्रथम. १७ वर्षे वयोगट-२२.४०मीटर-थाळीफेक-हरिओम भोसले (प्रथम), १९ वर्ष वय- ३.२० मीटर- लांब उडी - प्राजक्ता भोसले (दुसरा), १९ वर्षे,१३.१० मीटर-थाळीफेक व आणि ९.८० मिटर (भालाफेक)- मृदुला थिटे (दुसरा), १९ वर्षे- वय ८.७० मीटर-भालाफेक व ३.१० लांब उडी- प्रणाली भोसले - (तिसरा), १९ वर्षे- ७ मीटर भालाफेक - युवराज भोसले (तृतीय), १७ (वर्षे)- १२.४० मीटर थाळीफेक-सानिका चौगुले- तृतीय, १४ (वर्षे) १०. ५० मीटर-थाळीफेक-सिद्धी घड-तृतीय. यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक दिलीप भोसले यांचे मार्गर्शन मिळाले असून संस्थापक अध्यक्ष गणेश निळ, दिपक नीळ संचालक, प्राचार्य सुषमा निळ, मुख्याध्यापिका सुवर्णा माने, प्रा. दादासाहेब निळ, प्राध्यापिका तेजश्री कुलकर्णी यांनी अभिनदन केले आहे.

## ग्रामपंचायत निवडणुकीची २० डिसेंबर रोजी मतमोजणी

सुराज्य/ अक्कलकोट : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अक्कलकोट तालुक्यातील एकुण २० ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकिची मतमोजणी २० डिसेंबर रोजी अक्कलकोट नवीन तहसिल कार्यालय येथे सकाळी ९ वाजता सुरुवात होणार आहे. अशी माहिती तहसिलदार बाळासाहेब सिरसट यांनी दिली. २० थेट सरपंच व १३८ सदस्य जागे करिता मतमोजणी दोन फेरीत घेतली जाणार आहे. उर्वरित ३४ सदस्य हे बिनविरोध झाले आहेत.प्रथम फेरीत सकाळी नऊ वाजता बोरगांव दे., पालापूर, सुलतानपूर, बोरेगांव, शिरवळवाडी, शिरवळ, कोन्हाळी, अंकलगे, आंदेवाडी ज.,सलगर, नाविंदगी तर दुस-या फेरीत सकाळी साडेनऊ वाजता घोळसगांव, अरळी, दर्शनाळ, दहिटणेवाडी, सदलापूर, हालचिंचोळी, खानापूर, रुद्देवाडी, हत्तीकणबस या गावांचा समावेश आहे.

# सर्वच थकबाकीदारांवर शुक्रवारपासून महापालिका करणार कारवाई

## कर भरण्यासाठी उरले दोनच दिवस

## ७ दिवसात सव्वा सात कोटींची वसुली

सुराज्य/सोलापूर

मालमत्ता कर भरण्यासाठी जाहीर करण्यात आलेली विशेष अभय योजनेला केवळ दोनच दिवस राहिले असून थकबाकी मिळकतदारांनी आपला संपूर्ण कर जमा करावा. शुक्रवार, १६ डिसेंबर सर्वच थकबाकीदारांवर कारवाई करण्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.

महापालिकेच्या मिळकत कराची तीन लाखावरील थकबाकी असलेल्या तब्बल ११०० मिळकतदारांना नोटिसा पाठविण्यात आल्या होत्या. थकबाकी असलेले कर वसूल करण्याबरोबरच दुसरीकडे कारवाईची मोहीम देखील हाती घेण्यात आली आहे. महापालिकेच्या आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांच्या नियंत्रणाखाली कर संकलन विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून विशेष पथकाच्या माध्यमातून ही वसुली मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे.



आता रोख रक्कम किंवा ऑनलाईनद्वारे कर भरावा लागणार. १५ डिसेंबरपर्यंत सवलत अभय योजना आहे. दरम्यान बुधवारी व गुरुवारी मिळकतदारांनी कर भरण्याकरिता धनादेश भरणा करू नये. केवळ डीडी, आरटीजीएस, ऑनलाइन आणि फक्त रोख स्वरूपातच कर भरावा, असे आवाहन उपायुक्त विद्या पोळ यांनी केले आहे.

### सात दिवसात ७ कोटी १५ लाखांची कर वसुली

गेल्या सात दिवसात ७ कोटी १५ लाख रुपयांची वसुली करण्यात आली असून ६ कोटी ७२ लाखांच्या थकबाकीपोटी ९ मिळकती सीलबंद केल्या आहेत.

दरम्यान थकबाकीपैकी काही जणांनी निम्मी रक्कम भरली आहे, त्यांना सवलत मिळणार नाही. एक रक्कमी कर भरावा लागणार आहे. सील केल्यानंतर पुढील पंधरा दिवसात कराची रक्कम एकरक्कमी भरल्यास पुढील लिलावाची प्रक्रिया टाळता येणार आहे. अन्यथा महापालिका प्रक्रिया पूर्ण करून त्या मिळकतींची लिलाव प्रक्रिया करणार असल्याचे उपायुक्त विद्या पोळ यांनी स्पष्ट केले आहे.

### मंगळवारी दोन कोटींच्यावर वसुली

महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून मंगळवारी ८ लाख ३० हजार ९४९ रुपयांचे कर थकबाकी असल्याने रेल्वे लाईन परिसरातील आनंद मारुती वाघमारे यांचा एक गाळा सील करण्यात आला. शिवाय कारवाईसाठी गेलेल्या १३ जणांनी आपल्या मिळकतीवरील जप्ती कारवाई टाळून ८७ लाख ३ हजार ७४९ रुपयांचे थकीत कर जमा केला आहे. मंगळवारी दिवसभरात एकूण २ कोटी १६ लाख ५२ हजार ४४३ रुपयांचा कर वसूल करण्यात आला.



## रामपूरच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही : आ. कल्याणशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट

रामपूर येथे अर्धा किलोमीटर अंतराचे १५ लाख रुपये खर्चाचे डांबरी रस्त्याचे लोकार्पण सोहळा, वेशीपासून हनुमान मंदिर पर्यंतचे ५ लाख रुपये खर्चाचे सिमेंट काँक्रीट रस्ता, ४ लाख रुपये खर्चाचे यलम्मा मंदिर संरक्षण भींतीचे भूमिपूजन, आशा विविध विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

रामपूर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू देणार नाही. अशी ग्वाही आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली. रामपूर (ता. अक्कलकोट) येथील ग्रामपंचायतीच्या २५ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

आ. कल्याणशेट्टी म्हणाले, 'रामपूर हा गाव मागील अनेक वर्षांपासून आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे.

यामुळे तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी म्हणावा तसा विकास केला नाही. तरीही ग्रामस्थांनी सतत आम्हाला साथ दिली आहे. यामुळे आता योग्य वेळ आली असून गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता आमची आहे. तरी ग्रामस्थांनी चिंता करण्याचे कारण नाही.

सध्या दिलेले २५ लाखाचे कामे पूर्ण होताच आणखीन निधी देऊ. तुम्हांला कामे करायला जागा राहणार नाही. इतकी निधी देऊ असे सांगून मला या गावाची पूर्ती जाण आहे. यापुढे विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही', अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी सरपंच शोभा बिराजदार, उपसरपंच रोहिणी फुलारी, उंबरगे सोसायटी चेअरमन सिद्धाराम बाके, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता रविशंकर बोदले, नागराज कुंभार, गव्हरमेन्ट ठेकेदार विलास चव्हाण, सुरेश व्हाटे, ग्रा. पं. सदस्य सोमशेखर दिंडुरे, निर्मला कोणदे, आंदव्वा बोलकोटगी, चिदानंद वाघमारे, मुरलीधर चव्हाण, ग्रामसेवक वाले यांच्यासह मल्लिकार्जुन बिराजदार, सागर बिराजदार, शिवपुत्र रेऊरे, काळप्पा सुतार, बसवराज सुतार, लक्ष्मीपुत्र बिराजदार, बालाजी पाटील, दिलीप कदम, यांच्यासह रामपूर, इटगे आदि उपस्थित होते.

## सोलापूर बंदला शिवा संघटनेचा पाठिंबा

सुराज्य/सोलापूर

छत्रपती शिवाजी महाराज, घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील या महापुरुषांबद्दल अवमानकारक वक्तव्याच्या निषेधार्थ शुक्रवारी पुकारण्यात आलेल्या सोलापूर बंदला शिवा संघटनेने पाठिंबा जाहीर केला आहे.

संघटनेची बैठक स्वागत नगर येथील शिवा संघटनेच्या कार्यालयात झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. जिल्हाध्यक्ष संतोष केंगनाळकर म्हणाले, 'राज्यपाल आणि भाजपा नेत्यांनी अवमान करणारी वक्तव्ये करू नयेत. जबाबदार लोकप्रतिनिधी असूनही असे वक्तव्य करून जनतेच्या भावना दुखावण्याचा यांचा हेतू आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. प्रत्येक राजकीय पक्षांनी तसेच सर्वांनीच महापुरुषांबद्दल बोलताना तारतम्य बाळगायला हवे. महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणे अत्यंत अयोग्य आहे. त्यामुळे या वक्तव्यांचा निषेध करण्यासाठी पुकारण्यात आलेल्या बंदला शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचा संपूर्ण पाठिंबा आहे, असे जिल्हाध्यक्ष संतोष केंगनाळकर यांनी सांगितले.

या बैठकीच्या वेळी शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष केंगनाळकर, शिवा संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अरविंद बडोळे, जिल्हा अध्यक्ष राजकुमार सारणे, कार्याध्यक्ष आनंद बुक्कानुवरे, सरचिटणीस महांतेश पाटील, नागप्पा कोप्पा, ओमप्रकाश बाबळे, सोमनाथ हिंगमिरे, अप्पू यलशेट्टी, मल्लिनाथ पाटील, परमेश्वर अरबळे, अजय लुट्टे, भीमाशंकर बिराजदार, श्रीमंत पाटील, शरण ढेपे आदी उपस्थित होते.

## 'हसरतें' नवी मालिका प्रेक्षकांच्या भेटीला

सुराज्य/सोलापूर : हंगामा प्ले, हा हंगामा डिजीटल मीडिया मालकीचा अग्रगण्य ओटीटी प्लॅटफॉर्म असून त्यांच्यावतीने नवी कोरी हिंदी कथासंग्रह मालिका-हसरतें लॉन्च करण्यात आली.या मालिकेत सुप्रसिद्ध कलाकार मोनालिसा, अदा खान, कृष्णा मुखर्जी, रवी भाटिया, विन राणा, शिल्पा तुळसकर, सना सय्यद, सिद्धार्थ शर्मा, आयुष आनंद आणि साहिल उप्पल मुख्य भूमिकेत दिसतील. ही मालिका शाकुंतलम टेलिफिल्म्स निर्मित आणि हेमंत प्रभू, नीलिमा बाजपेयी आणि अंशुमन किशोर सिंह दिग्दर्शित आहे.

## सोलापूरचे डॉ. किणीकर आणि शहा राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेत उपविजेते

सुराज्य/सोलापूर

इंडियन डेंटल असोसिएशनच्यावतीने मुंबईमध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत लॉन टेनिसमध्ये सोलापूरचे डॉ. किरण किणीकर आणि डॉ. आरूष शहा हे उपविजेते ठरले.

देशभरातील दंतरोग तज्ञांची संघटना असलेल्या इंडियन डेंटल असोसिएशनच्यावतीने ऑल इंडिया स्पोर्टस समिट २०२२ मुंबई येथील अंधेरी स्पोर्टस कॉम्प्लेक्समध्ये घेण्यात आले. देशातील दंत रोग तज्ञ एकत्र यावेत, त्यांच्याकडील माहिती आणि विचारांची देवाण घेवाण व्हावी तसेच एकमेकांमधील कलागुण तसेच क्रीडागुण समोर यावेत या हेतूने ही स्पर्धा राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा पहिल्याच वर्षी आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये देशातील सर्व राज्यात कार्यरत असलेले दंतरोग तज्ञांनी सहभाग घेतला होता. यामध्ये विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन यावेळी




सोलापूरचे डॉ. किरण किणीकर आणि डॉ. आरूष शहा यांनी लॉन टेनिस डबलमध्ये आपली चमकदार खेळी दाखवून नागपूरच्या डॉक्टरांशी सामना केला. त्यामध्ये सोलापूरच्या डॉ. किरण किणीकर आणि डॉ. आरूष शहा यांनी उपविजेतेपद पटकावले.

दरम्यान डॉ. आरूष शहा यांनी लॉन टेनिस सिंगलमध्येही उपविजेतेपद मिळवले. संपूर्ण देशभरातील दंत रोग तज्ञांच्या या स्पर्धेत सोलापूरच्या या दोन दंतरोग तज्ञांनी आपल्या क्रीडा कौशल्याने लॉन टेनिसमध्ये यश मिळवून संपूर्ण देशातील दंतरोग तज्ञामध्ये सोलापूरचा नावलौकिक वाढवला आहे त्यामुळे त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## दलित स्वयंसेवक संघाकडून चंद्रकांत पाटलांच्या वक्तव्याचा निषेध

सुराज्य/मोहोळ

**उच्च शिक्षणमंत्री चद्रकांत पाटील यांच्या वक्तव्याचा दलित स्वयंसेवक संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी भिक मागून शाळा सुरु केल्या, असे वक्तव्य करून चंद्रकांत पाटील यांनी



महापुरुषांचा अवमान केला. त्याबद्दल दलित स्वयंसेवक संघ महाराष्ट्र राज्याच्यावतीने निषेध व्यक्त करून याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले, असे गैर व चुकीचे वक्तव्य करणाऱ्या राजकीय बगल बच्चू पुढाऱ्यांना दलित स्वयंसेवक संघ महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी दलित स्वयसेवक संघाचे संस्थापक अध्यक्ष दिलीप देवकुळे, राज्य उपाध्यक्ष मिलिंद अष्टुळ, जिल्हा अध्यक्ष फकीरा जाधव, दिनेश माने, सत्यवान जाधव उपस्थित होते.

## ऑर्किड अभियांत्रिकीला चार सुवर्ण व एक रौप्यपदक

सुराज्य/सोलापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या सोलापूर-पुणे आविष्कार झोनल स्पर्धेमध्ये ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाने दैदिप्यमान यश संपादित केले. ऑर्किडच्या विद्यार्थिनी एकूण ६ विभागामधून ४ सुवर्ण व एक रौप्यपदक मिळविले. ही स्पर्धा एकूण ६ प्रवर्गामध्ये घेण्यात आली, सोलापुर व पुणे विभागातून एकूण ८३ कॉलेजमधून १५० प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले.

'इंजिनिअरिंग व टेक्नोलॉजी' या प्रवर्गामध्ये सौर उर्जेवरती चालणाऱ्या 'पाणी शुद्धीकरण' प्रकल्पास सुवर्णपदक मिळाले. या प्रकल्पामध्ये आदित्य मेतन व सहकारी विदयार्थ्यांनी डॉ. श्रीनिवास मेतन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प विकसित केला.

भारतात दरवर्षी एक लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू दूषित पाण्यामुळे होतो. ग्रामीण भागातील लोकांना सध्या वापरात असलेले जलशुद्धीकरण उपकरण हे जास्त किंमत व विजेची उपलब्धता नसल्यामुळे उपयुक्त होत नाहीत. या समस्येवरती उपाय म्हणून सौर उर्जेवर चालणारे व दिवसाला १२० लिटर पाणी शुद्धीकरण करणारे तंत्रज्ञान विकसित केले आहे.

'ह्यूमॅनिटी आणि लॅंग्वेजेस' या प्रवर्गातून सांकेतिक भाषा ळपींशीशिंशी या मोबाईल ॲप प्रकल्पास सुवर्णपदक प्राप्त झाले. रामानंद मोहारे व सहकारी



विद्यार्थ्यांनी प्रा. मनिषा ओतारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश संपादित केले. मूकबधीर व सामान्य लोकांमध्ये संवाद साधण्यासाठी हे ॲप उपयुक्त ठरत आहे. मूकबधीर लोकांसाठी खुणांची भाषा तसेच संबंधित विविध प्रश्न देखील ह्या मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध आहेत. ॲग्रीकल्चर व निमल हजबंडरी' या प्रवर्गामध्ये 'प्राता' या शेतकऱ्यांसाठी बनवलेल्या मोबाईल ॲपला सुवर्णपदक प्राप्त झाले. हे ॲप आयुषा होमकर व सहकारी विद्यार्थ्यांनी डॉ. विपुल बाग यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी केले. हवामानातील बदलांमुळे पिकांवर व उत्पादकतेवर परिणाम होत आहे.

या ॲपमुळे मातीतील घटकांचे विश्लेषण करून योग्य असे पिक सुचविले जाईल. त्याचप्रमाणे कॅमेऱ्याच्या साहाय्याने पिकाच्या वाढीवर लक्ष ठेवून व्यवस्थित वाढीसाठी पोषक द्रव्ये सूचित केले जातील. यामुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

'कॉमर्स व मॅनेजमेंट' या प्रवर्गामध्ये बांधकाम साहित्य व वाहतूक व्यवस्थापन' या वेब ॲप्लीकेशन प्रकल्पासाठी रौप्यपदक मिळाले. हे वेब ॲप्लीकेशन अंकिता होटकर व टीम सदस्यांनी डॉ. प्रभावती बहिरगोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली समृध्द केले. या वेब ॲप्लीकेशनद्वारे बांधकाम व वाहतूक या व्यवसायांना मॅनेजमेंट व ईकॉमर्सच्या मदतीने ग्राहकांना चांगल्या व जलदसेवा पोहोचविण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदिपक कामगिरीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. दफेदार व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.


## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डी. सोलापूर सब डी व तालुका पंढरपूर पैकी मौजे इसबावी येथील शेतजमीन गट नं. ६६ / १७ क्षेत्र ०० हे. ४८ आर आकार ०० रू. ६० पैसे पैकी ०० हे. ०६ आर आकार ०० रु. ०८ पैसे येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत यात असणाऱ्या सर्व तद्भुत वस्तु व हक्कासह मिळकतीचे मालक सुनिल रामराव गायकवाड यांचे खरेदी मालकीची, वहिवाटीची असून त्यांनी आमचं अशिल यांना कायमखुश खरेदी देण्याचे ठरवुन आमचे आशिलाकडून इसारापोटी काही रक्कम स्विकारलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध, निजोखीम व बोजाविरहीत असलेबाबत आमचे आशिलांना हमी व भरवसा दिलेला आहे. त्यामुळे आमचे आशिल लवकरच वर नमुद मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणार आहेत. तरी देखील सदर मिळकती बाबत कोणाचीही, कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध तसेच कोणत्याही प्रकारचे साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, बक्षीसपत्र, करारपत्र, भाडेपट्टा, कब्जेवहिवाट तसेच हातउसणे व्यवहार, बोजा, सावकारकी वगैरे प्रकारचा हितसंबंध असल्यास तसेच सदर मिळकतीचे मालकी व कब्जे वहिवाटी बाबत कोणत्याही न्यायालयात दावा, अपील अर्ज, पोटगी, हक्क, वाटणी, कब्जेबावत, वहिवाटीबाबत वगैरे प्रकारचा वाद प्रलंबित अथवा निकाली असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत खालील पत्यावरती कागदोपत्री पुराव्यासह प्रत्यक्ष भेटून लेखी हरकत नोंदवुन तशी पोहच घ्यावी. मुदतीत वर नमुद केल्याप्रमाणे कोणाचीही कसलीही तकार, हरकत न आल्यास सदरच्या मिळकती निर्वेध, निजोखीम व बोजा विरहीत आहेत असे समजुन आमचे आशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाचीही कसलीही तकार हरकत चालणार नाही व आमचे आशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. ही जाहीर नोटीस दिली ता. १२/१२/२०२२.

सही/-

**ॲड. अमर बाळासाहेब देशमुख**
**ॲड. सिध्देश्वर ज्ञानदेव पाटील**
**ॲड. सुमित संजय साळुखे**
ऑ. १२००/ब भगवंत नवी पेठ, पंढरपूर जि.सोलापूर.
मो.नं.४२२०६६३८३

# 'अवकाळी'चा तडाखा; बळीराजा संकटात; द्राक्ष, डाळींब, कांदा पिकांचे मोठे नुकसान

## सत्ताधारी-विरोधकांनी राजकारण थांबवून 'साथ' आणि 'हात' देण्याची द्राक्षबागायतदारांची मागणी

सुराज्य/सोलापूर

शेती आणि शेतकऱ्यांवरील संकटांची मालिका थांबायला तयार नाही. धोरण आणि बाजार भावानी शेतकरी नाडला असताना आता अवकाळी पावसाने झोडपल्याने सोलापूर जिल्ह्यातील द्राक्ष डाळिंब आणि कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.यामुळे बळिराजा चिंतेत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, करमाळा, माळशिरस, सांगोला, माढा तालुक्यात जास्त प्रमाणात पाऊस झाल्याने तेथील द्राक्ष, डाळींब बागांचे नुकसान झाले आहे. पंढरपूर तालुक्यातील कासेगाव, ईश्वर वठार, पुळूजसह परिसरात द्राक्ष बागांची मोठ्या प्रमाणात शेती केली जात असून तेथील बागांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले असल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले.

जिल्ह्यात अवकाळी पाऊस सर्वच तालुक्यात पडल्याने पिकांचे नुकसान झाले आहे.त्यामुळे शेतकरी संघटनांचे पदाधिकारी यांनी शासन, प्रशासनाकडे पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी केली आहे. तर सत्ताधारी व विरोधी पक्षाने कुरघोडींचे राजकारण थांबवून शेतकऱ्यांना साथ देत मदतीचा हात देण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे.



**ऊस तोडणी खोळंबली :** अवकाळी पावसाने ऊस तोडणीवर परिणाम झाला आहे.जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून पाऊस सुरू असल्याने ऊस तोडणीवर त्याचा परिणाम झाला आहे. शेतात बैलगाडी, ट्रॅक्टर जात नाहीत. त्यामुळे कमी प्रमाणात ऊस वाहतूक होत आहे.या अवकाळी पावसाने ऊसतोड मुजुरांची ही दाणादाण उडवली आहे.त्यांच्या झोपड्यात पावसाचे पाणी शिरल्याने त्यांची तारांबळ उडाली आहे. ऊसतोड मजूर निवाऱ्यासाठी इतर ठिकाणाचा शोध घेत आहेत. तर काही ऊसतोड कामगारांनी आहे,तेथेच राहणे पसंद केले आहे. झोपडीत आलेले पाणी त्यांनी भांड्यांचा सहाय्याने बाहेर काढून टाकले आहे. ऊसतोड मजुरांवर या अवकाळी पाऊसाची अवकृपा झाली आहे.त्यामुळे ऊसतोड मजूर चिंतेत आहे. तर जिल्ह्यातील नदी, नाले, तळी यांना अवकाळी पावसामुळे पाणी वाढू लागले आहे.

### शेतकरी धास्तावले

जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाल्याने काढणीला आलेल्या कांदा पिकांवर त्याचा परिणाम झाला आहे.या अवकाळी पावसाचे पाणी कांद्याच्या शेतात साठल्याने कांदा पीक नासून जाण्याची भीती शेतकऱ्यांतुन व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांनी गेली चार महिने कांदा पिकासाठी घेतलेली मेहनत वाया जाणार आहे.कांद्याला सोलापूर मधील मार्केटमध्ये कवडीलमोल किंमत येत आहे. कांद्याच्या पिकासाठी शेतकऱ्यांनी फवारणी, नांगरणी, खुरपणी, काढणी यासाठी केलेला खर्च कांदा विक्रीतून मिळेना गेला आहे. मार्केटला कांदा नेहण्यासाठी वापरलेल्या वाहनाचे भाडे शेतकऱ्यांना खिशातून द्यावे लागत आहे.त्यात अवकाळी पाऊस कांदा पिकाचे नुकसान करू लागल्याने शेतकऱ्यांवर अस्मानी संकट कोसळले आहे.

### वर्षाकाठी मिळतात १ लाख रुपये

द्राक्ष बागांना दोन छाटण्याचा खर्च मिळून कमीत-कमी एकरी दीड ते दोन लाख रुपये खर्च येतो.नुसत्या फवारणी आणि मजुरांचा हा खर्च आहे.द्राक्ष बागांचे वर्षाला कमीत-कमी ३ लाख रुपयांचे उत्पन्न गृहीत धरले जाते.यातून २ लाख रुपये बागेला खर्च होतात.तर १ लाख रुपये नफा मिळतो.गेल्या दोन वर्षांपासून शेतकरी अडचणीत आला आहे बागांच्या देखभालीसाठी बँकांकडून कर्ज घेतले आहे. एवढा खर्च करूनही अवकाळी पाऊसमुळे द्राक्ष येईल का नाही याची शास्वती नाही.त्यामुळे बँकांचे कर्ज फेडायचे कसे हा प्रश्न बळिराजा पुढे उभा राहिला आहे.

### उत्पादन कमी आणि खर्च जास्त

आमच्या गावासह इतरांनी द्राक्षांचे छाटणी करून सध्या फ्लोरा व फळ धारनेच्या स्थितीत असणारे ३० ते ४० टक्के प्लॉट होते.अवकाळी पावसामुळे त्या बागा १०० टक्के पूर्णपणे वाया गेल्या आहेत.. गळ आणि मणीकुज कुज आली आहे. पुढे ही असाच पाऊस राहिला तर द्राक्ष बागांवर दावण्या आणि करप्या रोगांचा प्राधुर्भाव होणार असून महागडी औषधे आणून फवारली जात आहेत .%० ते ८० टक्के द्राक्षांच्या बागा दावण्या व करप्या या रोगांमुळे गेल्या आहेत. या बागांची पावसामुळे होणारी दैनिय अवस्था आम्हाला पाहवत नाही.त्यामुळे कोणी कोणतेही फवारणीचे औषध सांगितले.तर तेही आणून द्राक्ष बागांवर फवारतो.त्याचा रिझल्ट ही या वातावरणामुळे मिळेना गेला आहे. औषधांच्या किमती भरमसाट वाढल्या आहेत.त्यामुळे उत्पादन कमी आणि बागांवर खर्च जास्त होत आहे.

**- अगतराव रनदिवे, द्राक्ष बागायतदार, तुंगत**

### राजकारण्यांनी राजकारण थांबवून साथ आणि हात देण्यासाठी पुढे यावे

सलग तीन वर्षापासून द्राक्ष बागायतदार संकटात आहे. मागील वर्षी ५ ते ६ महिने द्राक्ष झाडावर राहिली. मार्च ते जून लॉकडाऊन पडल्याने गेल्या दोन वर्षांपासून द्राक्षांचा हंगाम वाया जात आहे. त्यामुळे द्राक्ष बागांचा गेल्या दोन वर्षांपासून आम्हाला काही फायदा झाला नाही.आमचा द्राक्ष बागांवर झालेला खर्च सुद्धा निघाला नाही.यावर्षी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने द्राक्ष बागांचे ७० टक्के नुकसान झाले आहे.त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांचा विचार करून पंचनामे करीत नुकसान भरपाई द्यावी.

**- प्रशांत देशमुख, जिल्हा अध्यक्ष द्राक्षबागायतदार संघ**



## भोसले यांच्या नेतृत्वाखाली महाप्रसाद हे सेवाकार्य ऑस्ट्रेलियात पोहोचले : शिंदे

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली महाप्रसाद सेवाकार्य हे ऑस्ट्रेलियात देखील पोहोचल्याचे मनोगत करमाळ्याचे माजी पं.स.सभापती, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे विश्वस्त संपतराव शिंदे यांचे चिरंजीव व ऑस्ट्रेलिया ब्रिजमेंट सिनिअर प्रोजेक्ट मॅनेजर विजयसिंह शिंदे यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटूंब आले असता न्यासाचे न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, विश्वस्त संतपराव शिंदे, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, राजेंद्र लिंबीतोटे, प्रा.शिवशरण अचलेर हे उपस्थित होते. यावेळी विश्वस्त लक्ष्मण पाटील, निखिल पाटील, सिध्दाराम कल्याणी, एस.के.स्वामी, संजय कुलकर्णी, सतिश महिंद्रकर, शहाजी यादव, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, कल्याण देशमुख, संभाजीराव पवार, बाळासाहेब पोळ, देवराज हंजगे, प्रसाद हुल्ले, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, मल्लिकार्जुन बिराजदार आदीजण उपस्थित होते.



## पुरस्कार मिळाल्याबद्दल अमोलराजे भोसले यांचा सत्कार

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांना विक्रमशीला हिंन्दी विद्यापीठ-भागलपूर, बिहार सारस्वत सन्मान वर्ष-२०२२ चा सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र भूषण' या पुरस्कार मिळाल्याबद्दल कुरनूर ग्रामस्थ व माजी पं.स.चे विरोधी पक्षनेते बाळासाहेब मोरे यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. नुकतेच पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य विभाग सभागृहात केंद्रीय शाखा महाराष्ट्र राज्य आयोजित विशेष सारस्वत सन्मान वर्ष-२०२२ चा महाराष्ट्र भूषण' या पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला होता. अमोलराजे भोसले यांचा सत्कार कुरनूर ग्रामस्थ व माजी पं.स.चे विरोधी पक्षनेते बाळासाहेब मोरे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात संपन्न झाला. या कार्यक्रमास श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, संजय मोरे, मैनुद्दीन कोरबु, साधु लोहार, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त लक्ष्मण पाटील, निखिल पाटील, सिध्दाराम कल्याणी, एस.के.स्वामी, संजय कुलकर्णी, सतिश महिंद्रकर, शहाजी यादव, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, कल्याण देशमुख, संभाजीराव पवार आदीजण उपस्थित होते.

# कुर्डुवाडीत टायर चोरीत बाप-लेकाला अटक

सुराज्य/कुर्डूवाडी

आकुलगाव (ता.माढा) येथील ट्रॅक्टर ट्रॉलीचे ३६ हजार रुपयाचे चोरीस गेलेले दोन टायरसह बाप लेकांना कुर्डुवाडी पोलिसांनी मुद्देमालासह अटक केली. ही कारवाई अकुलगाव (ता.माढा) शिवारात मंगळवार दि.१३ रोजी करण्यात आली.

ज्योतिराम लिंबाजी खुणे, वय ५२, विक्रांत ज्योतिराम खुणे वय १९ (दोघे रा.अकुलगाव ता.माढा) असे अटक करण्यात आलेल्या बाप लेकांची नावे आहेत. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात चालक निखिल महादेव कापुरे रा. अकुलगाव याने दिलेल्या फिर्यादीनुसार ट्रॅक्टर मालक सुहास उबाळे यांनी दोन नवीन टायर चालक निखिल कापुरे यांना ट्रॅक्टर ट्रॉलीला बसविण्यासाठी दिले होते. फिर्यादीने टायर सोमवार दि.१२ रैजी रात्री घरासमोर पत्र्याच्या शेडमध्ये ठेवले होते. पहाटे ४.३० वाजता फिर्यादीच्या आई झाडलोट साठी घरा बाहेर आल्या असता दोन्ही टायर शेडमध्ये दिसून आले नाहीत. फिर्यादीने शोधाशोध सुरु केली तेंव्हा पाऊस झालेल्याने चिखलात टायरचे वन आरोपींच्या शेताच्या दिशेने गेलेले दिसले. यावरून फिर्यादीला टायर वरील आरोपींनीच चोरले असावेत असा दाट संशय आला. त्यानंतर पोलिस ठाण्यात टायर चोरीची फिर्याद देताना संशयितांबाबत माहिती दिली. या माहितीवरून कुर्डुवाडी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता आरोपींच्या शेवरीच्या शेतात फिर्यादीने सांगितलेल्या वर्णनाचे ट्यूब टायर आढळून आले. यावरून पोलिसांनी वरील दोघा आरोपींना रात्री उशीराने अटक केली. चोरीची कारवाई पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलिस अधिक्षक हिम्मत जाधव, विभागीय पोलिस अधिक्षक विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलिस निरीक्षक विक्रांत बोधे यांच्या पथकातील पो.कॉ. बाबासाहेब घाडगे, दीपक घोरपडे, विजय डोंगरे, हरिश्चंद्र चाकणे, हरिश्चंद्र पाटील विनेश नागरगोजे, संभाजी शिंदे, संभाजी सोनवणे, ओमप्रकाश दासरे, सिद्धनाथ वलटे, भारती डांगरे, मनिषा मंठोळे, शिवाजी कांबळे आदींनी ही कामगिरी केली.



### अधिक मुद्देमाल सापडण्याची शक्यता

या संशयित आरोपींकडून शेतातील मोटारी, फवारणी पंप, शेती अवजारे, विद्युत मोटारी केबल घराच्या लोखंडी खिडक्या, ठिंबक पाईप, व शेतातील छोटी मोठे शेती साहित्य चोरली असल्याचा संशय व्यक्त होत आहे. चोराला ताब्यात घेतल्याचे शेतकऱ्यांना समजताच पोलिस ठाण्यात परिसरात शेतकरी जमा झाले होते. पोलिसांच्या तपासात अधिक चोरीचा मुद्देमाल जप्त होण्याची शक्यता आहे.

## मेव्हण्याला भावजीकडुन मारहाण

सुराज्य/सोलापूर

माझ्या बहिणीला का मारले या कारणावरून मेव्हण्याला भाऊजींने शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि.१२ डिसेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास लेमयेवाडी येथे घडली. याप्रकरणी कासिम सलीम नदाफ (वय-२२, रा.लिमयेवाडी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. समीर नदाफ, निदा नदाफ, शर्मिला साहेबलाल नदाब, रुबीना नदाफ (सर्व रा.गणेश नगर, विजापूर रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास स.पो. नि. देशमुख हे करीत आहेत.




## आंबेडकर वसतीगृहासाठी रिपब्लिकन पक्षाने दिला पाठिंबा...

सुराज्य/वेळापूर

अकलूज(ता माळशिरस) येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वसतिगृह भाडेतत्त्वावरील इमारतीमध्ये चालू आहे. परंतु प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे अकलूज येथे प्रशस्त इमारत उभा राहू शकली नाही ही मोठी शोकांतिका असल्याने अकलूज येथे डॉ आंबेडकर वस्तीगृहाची इमारत उभारण्यात यावी यासाठी उपोषणकर्ते अविनाश काले, गौतम भंडारे, नागेश लोंढे, यांनी प्रांत कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषण सुरू केले आहे.

याप्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका यांच्या वतीने निवासी नायब तहसीलदार देसाई मॅडम यांना निवेदन देऊन उपोषणास पाठिंबा देऊन उपोषणाची तात्काळ दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे. यापूर्वी पालकमंत्री प्रांताधिकारी, तसेच समाज कल्याण आयुक्त यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृहाची सुसज्ज इमारत उभारण्यात यावी यासाठी रिपाइं प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका यांच्यावतीने समाज कल्याण आयुक्त सोलापुर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे. सदर उपोषणास रिपाइंचा पाठिंबा देण्यात आला. यावेळी रिपाइं आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, जिल्हा युवक कार्याध्यक्ष किरणतात्या धाईंजे, माजी ता. अध्यक्ष नरेंद्र भोसले, युवक तालुका अध्यक्ष दशरथ नवगिरे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, संघटन सचिव पोपट गेजगे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, तालुका उपाध्यक्ष संजय भोसले, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, सचिव आण्णासाहेब भोसले, सुनील ओवाळ, अजितदादा साठे ,वेळापूर युवक शहराध्यक्ष स्वप्निल सरवदे, उमेश भोसले, अवदुत कांबळे आदिं. उपस्थित होते.

## फडणवीसांची हत्तीवरून मिरवणूक काढणार : दिलीप धोत्रे

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर कॉरीडोरबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर येथून पंढरपूर उध्वस्त न करता पंढरपूरचा विकास करू. असे जाहीर केले. यानंतर आज पंढरपुरातील स्थानिक नागरिक व्यापारी आणि वारकरी सांप्रदायाच्या बैठकित फडणवीस साहेब यांच्या आभाराचा ठराव झाला. मात्र देवेंद्र फडणवीस साहेबांनी आपले दिलेले वचन पाळावे.



त्यांनी कुठल्याही नागरिकाचे विस्थापन न करता घरदार न पडता पंढरपूरच्या विकास करायला जर सुरुवात केली, तर त्यांची पंढरपुरातून आम्ही हत्तीवरून मिरवणूक काढू अशी घोषणा मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केली. पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समिती आणि संतभूमी बचाव समिती तसेच सर्वपक्षीय बैठक आज पंढरपूर येथे संपन्न झाली. या बैठकीत याबाबतचा ठराव झाला. तसेच पंढरपूर कॉरिडोर बाबत देखील विविध विषयांवर चर्चा झाली. तसेच कॉरिडॉर मध्ये लोकांची घरदार वाचवण्यासाठी आगामी काळात कुठली भूमिका असावी. याबाबतही चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. यावेळी ह.भ.प रामकृष्ण महाराज वीर, आदित्य फत्तेपुरकर, ऋषिकेश उत्पात, बाबाराव महाजन बडवे, श्रीकांत हरिदास, नाना मालक कवठेकर, संतोष कवडे, सुमित शिंदे, गणेश अंकुशराव, गजानन भिंगे, नकुल बडवे यासह मोठ्या संख्येने नागरिक व्यापारी उपस्थित होते.



## पंढरपुरात राजरोस वाळू चोरी; वाळू माफियांचा धुडगूस

सुराज्य/पंढरपूर

राजरोसपणे वाळू माफियांनी उच्छाद मांडला आहे. पंढरपुरातील नदीकाठच्या गावातून दररोज वाहनातून वाळू माफिया वाळू दिसत आहेत. बेसुमार वाळू उपशाकडे महसूल प्रशासनाने डोळे झाक केली आहे.

वाळू माफियांशी मिली भगत असल्यामुळे वाळू माफियांवर कारवाई होताना दिसत नाही. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वारंवार वाळू माफियावर कारवाई करा, असे आदेश देऊन सुद्धा कारवाई होताना दिसत नाही. तीर्थक्षेत्र पंढरपूरमध्ये वाळू माफियांनी चंद्रभागा नदीची चाळणी केली आहे. असे असताना मात्र अधिकारी याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करताना दिसत आहेत. पंढरपूर तालुक्यातील नदीकाठच्या गावामध्ये रात्रींत शेकडो ब्रास वाळू उपसा केला जात आहे. गुरसाळे, चिंचोली भोसे, भटुंबरे, शेगाव दुमाला, गोपाळपूर, चळे, मुंडेवाडी, अजनसोंड, पुळूज, खरसोळी, आंबे, सरकोलीतुन वाळू उपसा सुरू आहे. महसूल प्रशासनाने रात्रीची गस्त सुरू केली आहे. वाळू माफियाना रोखण्यात महसूल विभाग आणि पोलिसांना अपयश येत आहे.

### वाळूमाफियांच्या मुसक्या अवळणार

पंढरपूर तालुक्या पोलीस हद्दीतील गावांमध्ये रात्रभर पोलिस गस्त घालत असतात. तरीदेखील काही गावांमध्ये वाळू माफियांनी वाळू उपसा सुरू केला असेल. त्या गावात विशेष लक्ष देऊन वाळू माफियांच्या मुसक्या आवळण्यात येतील.

**- मिलिंद पाटील,**
पोलीस निरीक्षक, पंढरपुर

# सोशल मीडियावर निकालाआधीच 'गुलालाची' मुक्त उधळण

सुराज्य सोलापूर
Classified
वधु-वर विषयक
● वधु - २६, ५.३, गोरी, १२ वी हिंदू मराठा, वडील नाहीत, आईल मुलीचे पुजा सामग्रीचे दुकान, शेती ४ एकर, मुलीकरीता सर्वजातीय वर चालेल.
संपर्क : **8378879265**
**7028536999**
(191222)

सुराज्य/चिखली

मोहोळ तालुक्यातील कामती बु, यावली, वाफळे, कुरणवाडी (आष्टी), मोरवंची, अर्धनारी, बैरागवाडी, अरबळी, सारोळे, डिकसळ, अशा एकूण १० ग्रामपंचायत पैकी डिकसळ हि ग्रामपंचायत सरपंच सदस्यांसह बिनविरोध तर दोन ग्रामपंचायत मध्ये सरपंच पद वगळता सदस्यांची निवड बिनविरोध झाली असून उर्वरित ९ ग्रामपंचायतींच्या निवडणूका या चुरशीच्या आणि लक्षवेधी लढतीत होत आहेत. सरपंच पदाची निवड ही थेट जनतेतून मतदानाव्दारे होणार आहे.

त्यामुळे अनेक उमेदवारांच्या समर्थकांनी सोशल मीडियावर निकालाआधीच 'गुलालाची' मुक्त उधळण करत विजयाचे दावे - प्रतिदावे करत गुलाल आपलाच असा नारा केला जात आहे. त्यामुळे सोशल मीडियावर इलेक्शन फिव्हर' गुलालमय झाल्याचे चित्र आहे. मोहोळ तालुक्यातील अर्धनारी ग्रामपंचायत सरपंच सदस्यांसह बिनविरोध झाली असून डिकसळ ग्रामपंचायत येथे ८ तर मोरवंची ग्रामपंचायत येथे ४ असे एकूण १२ सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे. ९ ग्रामपंचायतींच्या निवडणुकित ९ सरपंच पदासाठी २९ तर ७१ सदस्य पदासाठी १८९ असे एकूण २१८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात एकमेकांविरोधात आपले राजकीय नशीब आजमावत आहेत. उमेदवारांनी आणि त्यांच्या समर्थकांनी गावोगावी वॉर्डनिहाय मतदार आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी आणि बैठका घेऊन जोरदार प्रचार मोहीम राबवली जात आहे. विशेष म्हणजे - प्रचाराचा धुरळा जेव्हा थांबणार आहे. आणि छुप्या प्रचाराला ज्यावेळी सुरुवात होणार तेव्हाच यंत्रणा कशी 'सैराट' होऊन कामाला लागली आहे हे चित्र स्पष्ट दिसणार असल्याची चर्चा गावोगावी सुरू आहे.सद्या सोशल मीडिया हे एक जनसंपर्काचे प्रभावी माध्यम असल्याने फेसबुक, व्हॉटसऍपचा वापर करणाऱ्याची संख्या मोठी आहे. त्यामुळे प्रत्यक्ष भेटीगाठींबरोबरच फेसबुक आणि व्हॉटसऍपच्या माध्यमातून प्रत्येक मतदारापर्यंत पोहचण्याचा आटोकाट प्रयत्न केला जात आहे.




आपल्या गटाचा संबधित उमेदवार कसा योग्य आणि सक्षम आहे हे विविध स्लोगन, कॅचलाईनच्या माध्यमातून पटवून सांगितले जात आहे. सरपंच पदासाठी ९ गावांत प्रतिष्ठेच्या आणि तुल्यबळ लढती होत असल्यामुळे सोशल मीडियाचे नेटवर्क हाताळणारे दोन्ही गटाचे कार्यकर्ते सोशल मीडियावर प्रचारासाठी 'सैराट' झाले आहेत. मतदान आणि निकाल जाहीर होण्यापूर्वीच आपल्या नेत्यांच्या आणि उमेदवारांच्या छायाचित्रासह विजयाच्या राजकिय पोस्ट टाकून गुलाल आपलाच असा दावा करत निवडणूकीत चुरशीचे रंग भरु लागले आहेत. त्यामुळे सोशल मीडियावर ग्रामपंचायत निवडणूकीचा 'इलेक्शन फिव्हर' गुलालमय झाल्याने ग्रामपंचायत निवडणुकीचे फटाके फुटण्यास सुरुवात झाली आहे.

# जलयुक्तशिवार अभियान होणार सुरु

✔ सुराज्य/मुंबई

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी पार पडली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवार अभियान २.0 योजना सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबत राज्य सरकाराने राज्यातील ७५ हजार पदभरती प्रक्रियेला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. यासह राज्यांतील शाळांना ११00 कोटींचं अनुदान देण्यात मान्यता दिली आहे. मंगळवारच्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत १६ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहे. राज्य मंत्रिमंडळतील काही महत्त्वाचे निर्णय.



**शिंदे-फडणवीस मंत्रिमंडळ निर्णय -**

१) पिंपरी चिंचवड विद्यापीठ आणि युनिव्हर्सल एआय विद्यापीठ, कर्जत या स्वयं अर्थसहाय्य विद्यापीठांना मान्यता. २) महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र सिनेमा अधिनियमात शिक्षेच्या सुधारित तरतुदी. 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' साठी निर्गुन्हेगारीकरण करणार.

३) पुणे जिल्ह्यातील आंबेगांव बु. येथील शिवसृष्टी प्रकल्पास ५० कोटी अनुदान देणार. ४) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात ७५ हजार पदांची भरती प्रक्रियेला गती देणार. ५) खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मनरेगा आणि इतर विविध विभागांची सांगड. ६) राज्यातील ग्रामीण भागात सुविधा संपन्न कुटुंब मिशन राबविणार. ७) गगनबावडा आणि जत तालुक्यात मौजे संख येथे होणार ग्राम न्यायालय. ८) शेतजमिनींच्या ताब्यावरून वाद मिटवणारी सलोखा योजना. नाममात्र नोंदणी व मुद्रांक शुल्क आकारणारा. ९) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात ६० टक्के वाढ. वाचनसंस्कृतीला मिळणार बळ.

१०) राज्यातील शाळांना अनुदान. ११00 कोटींना मान्यता. ११) महाअधिवक्ता श्री आशुतोष कुंभकोणी यांचा राजीनामा स्वीकृत. १२) जलयुक्तशिवार अभियान २.0 सुरु करण्याचा मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय. राज्यातील गावे पुन्हा जलसमृध्द होणार. १३) कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करणार. कालबाह्य तरतुदी काढणार. कारावासाऐवजी वाढीव दंडाची तरतूद. १४) १३ सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जाच्या शासकीय थकहमीपोटी शासनाने बँकेस देय असलेली रक्कम अदा करणार.

१५) राज्यात काजू फळपीक विकास योजना लागू होणार. कोकणातील शेतकऱ्यांना होणार फायदा. १६) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात ६० टक्के वाढ. वाचनसंस्कृतीला मिळणार बळ.

# शरद पवारांना जीवे मारण्याची धमकी

✔ सुराज्य/मुंबई



**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना जीवे मारण्याची धमकी आली आहे. शरद पवारांच्या मुंबईतील सिल्वर ओक या निवासस्थानी फोन करून ही धमकी देण्यात आली. आरोपीने शरद पवारांना मुंबईत येऊन देशी कट्ट्याने जीवे मारण्याची धमकी दिली. २ डिसेंबर रोजी ही धमकी आल्याचे सूत्रांनी सांगितले.**

फोन करणाऱ्या अज्ञात व्यक्तीने हिंदीतून ही धमकी दिली.

सिल्वर ओकवरील टेलिफोन ऑपरेटर पोलीस कर्मचाऱ्याने दिलेल्या तक्रारीनुसार या प्रकरणी ग्रामदेवी पोलीस स्टेशनला अज्ञात व्यक्तिविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या आरोपींचा शोध घेत आहेत.

## नेमके काय घडले?

पवार यांचे मुंबईतील निवासस्थान असलेल्या सिल्वर ओकवर अनोळखी व्यक्तीने दूरध्वनी केला होता. पोलीस हवालदार कृष्णा देऊळकर यांनी याप्रकरणी तक्रार केली आहे. दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने पवार यांना मुंबईत येऊन देशी कट्ट्याने ठार मारण्याची धमकी दिली आहे. दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने हिंदीतून ही धमकी दिली. तक्रारीनुसार गावदेवी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात २९४, ५0६ (२) भादंवि कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मलिक जामीन प्रकरण; तातडीच्या सुनावणीस नकार

✔ सुराज्य/मुंबई



**कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याच्या मुंबईतील मालमत्तांशी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी अटकेत असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांनी वैद्यकीय जामिनासाठी केलेल्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास उच्च न्यायालयाने मंगळवारी नकार दिला. त्याचवेळी मलिक यांच्या वैद्यकीय स्थितीचा दोन आठवड्यांत अहवाल सादर करण्याचेही आदेश दिले.**

मलिक हे त्यांच्या पसंतीनुसार खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. तर दुसरीकडे अनेक कैद्यांना अशी सुविधा मिळत नाही याचाही विचार करायला हवा, असेही न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या एकलपीठाने मलिक यांच्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार देताना म्हटले. तसेच वैद्यकीय गरज भासल्यास मलिक हे सुट्टीकालीन न्यायालयाकडे दाद मागू शकतात, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. मलिक यांनी नियमित जामीनाचीही मागणी केली आहे. त्यावरील सुनावणी न्यायालयाने ६ जानेवारी रोजी ठेवली आहे.

# लोकार्पणानंतर लगेचच 'समृद्धी'वर अपघात




✔ सुराज्य/मुंबई

मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गावरील नागपूर - शिर्डी टप्प्याचे लोकार्पण झाल्यानंतर वाहतुकीसाठी खुल्या झालेल्या या मार्गावर अवघ्या काही तासांतच अपघात झाला. वायफळ टोलनाका येथे सोमवारी एका मोटारगाडीने दुसऱ्या मोटारगाडीला धडक दिली. सुदैवाने या अवघातात कोणीही जखमी झाले नाही. मात्र, दोन्ही मोटारगाड्यांचे नुकसान झाले.

समृद्ध महामार्गावरील ५२० किमीचा टप्पा रविवारपासून सेवेत दाखल झाला असून सोमवारी दुपारी नागपूर येथील वायफळ टोलनाक्यावर टोल भरण्यासाठी उभ्या असलेल्या मोटारगाडीवर मागून भरधाव वेगात आलेल्या मोटारगाडीने जोरदार धडक दिली. या अपघातात कोणीही जखमी झाले नाही, मात्र दोन्ही मोटारगाड्यांचे नुकसान झाले. टोलनाक्यावर भरधाव वेगात आलेल्या मोटारगाडीचा वेग तशी १०० ते १२० किमी इतका होता. टोलनाक्यावर इतक्या वेगात गाडी आणणे ही वाहनचालकाची चूक असून यामुळेच हा अपघात झाल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातील (एमएसआरडीसी) वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. तर वाहनचालकांना नियंत्रित करण्यासाठी आणि त्यांना शिस्त लावण्यासाठी लवकरच आवश्यक त्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, समृद्धी महामार्गावर काम सुरू असताना अनेक छोटे-मोठे अपघात झाले असून यात जीवितहानीही झाली आहे. मात्र, लोकार्पणानंतर झालेला हा पहिला अपघात असल्याने आता समृद्धी महामार्गावरील सुरक्षित प्रवासाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

# फडणवीस माझ्या पक्षाचे नेते; पंकजा



✔ सुराज्य/बीड : देवेंद्र फडणवीस हे आमच्या पक्षाचे नेते आहेत. त्यामुळे माझी त्यांच्याशी भेट होणे काही वेगळे नाही. तुम्ही काही वेगळा अर्थ काढू नका, असे मत व्यक्त करत पंकजा मुंडे यांनी फडणवीसांच्या आणि त्यांच्या भेटीबाबत स्पष्टीकरण दिले आहे. देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे यांची काही दिवसांपूर्वी भेट झाली आणि या भेटींनंतर राजकिय चर्चांना उधाण आले होते. त्यानंतर अखेर पंकजा मुंडे यांनी मौन सोडत आमच्या पक्षाचे नेते असल्याने भेट घेतल्याचे फडणवीस म्हणाले.

# भाजप कार्यालयावर शाई फेक




✔ सुराज्य/बीड : बारामती शहरातील भाजप संपर्क कार्यालयाच्या तसेच लगतच्या फलकावर एका भीमसैनिकाने शाई फेकून निषेध व्यक्त केला. राज्यपालांनंतर पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापुरुषांबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे. याबाबत महाराष्ट्रभर निषेध व्यक्त केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर बारामतीतील भाजप कार्यालयावर शाई फेकीचा प्रकार घडला आहे.

# एचआयव्हीबाधितांचे 'शुभ मंगल'

✔ सुराज्य/नाशिक : एचआयव्हीसारख्या आजाराशी झुंज देताना अनेकजण समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर जातात. या रुग्णांना सामाजिक आणि मानसिक आधार मिळावा, यासाठी आठव्या राज्यस्तरीय वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यातून 'एचआयव्ही'बाधित सात जोडपी विवाहबंधनात अडकणार आहेत.

नाशिक नेटवर्क, प्रेम फाउंडेशन, जिव्हाळा संस्था, तुळसाई संस्था, राष्ट्रसेवा दल यांच्यातर्फे एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या व्यक्तींचा वधू-वर परिचय मेळावा नुकताच झाला. त्र्यंबक नाक्यावरील हॉली क्रॉस चर्चमध्ये झालेल्या या मेळाव्यास एचआयव्हीसह जीवन जगणाऱ्या शेकडो वधू-वरांनी सहभाग नोंदविला होता.

या माध्यमातून सात विवाहदेखील जुळून आले. यामुळे गेल्या काही वर्षांपासून मुख्य प्रवाहापासून हरवलेल्या या जोडप्यांना जीवन जगण्याची नवी उमेद मिळणार आहे.

# भरभराटीसाठी काँग्रेस भवनमध्ये होमहवन?

✔ सुराज्य/पुणे



**काँग्रेसला पुन्हा भरभराटीचे दिवस यावेत, यासाठी काँग्रेस भवनमध्ये चक्क होमहवन करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. मात्र, काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी असा प्रकार झाला नसल्याचे स्पष्ट केले आहे. शिवाजीनगर येथे १९४० मध्ये काँग्रेस भवनची स्थापना करण्यात आली. काँग्रेस भवनच्या इतिहासात पहिल्यांदाच होमहवन आणि पूजाअर्चा झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.**

याबाबत काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले की, काँग्रेस भवनमध्ये असा प्रकार झालेला नाही.

चंद्रकांत पाटील यांच्यावरील शाई फेकण्याच्या प्रकाराची चर्चा सुरू असताना, लक्ष विचलित करण्यासाठी ही राजकीय खेळी आहे.

# बेपत्ता झालेल्या तरुणाचा बोपदेव घाटात खून

✔ सुराज्य/पुणे : हडपसर भागातून दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या तरुण बोपदेव घाटात मृतावस्थेत सापडला. तरुणाचा गोळी झाडून खून करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. गणेश मुळे असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. गणेश रविवारी (११ डिसेंबर) घरातून बेपत्ता झाला. तो बेपत्ता झाल्याचे लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

दरम्यान, कोंढवा परिसरातील बोपदेव घाटात सोमवारी रात्री गणेशचा मृतदेह सापडला. त्याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याचे उघडकीस आले. खुनामागचे कारण समजू शकले नाही. हडपसर पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.

# अखेर बिंग फुटले

## अडीच कोटींच्या सोनेचोरीत पोलिसही सामील

✔ सुराज्य/मुंबई : आपल्याकडील साडेचार किलो सोने लुटण्यात आले, अशी तक्रार मंगळुर येथील एका व्यापाऱ्याच्या नोकराने ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात दिली. त्याने सांगितलेला घटनाक्रम, सीसीटीव्ही फूटेज, तपास कौशल्य यांची सांगड घालत पोलिसांनी केलेल्या चौकशीदरम्यान या गुन्ह्यात नोकराचाच सहभाग असल्याचे आढळले.

धक्कादायक म्हणजे, दोन रेल्वे पोलिसांच्या मदतीने त्याने अडीच कोटींच्या सोनेचोरींचा बनाव केल्याचे समोर आले. ट्रॉम्बे पोलिसांनी नोकरासह दोन पोलिसांना अटक करींत त्यांच्याकडून साडेचार किलो सोने हस्तगत केले. मंगळुर येथील एका सोने व्यापाऱ्याने सुमारे साडेचार किलो सोने दागिने बनविण्यासाठी नोकर नितीन पाटील याच्यामार्फत मुंबईच्या झवेरी बाजारात पाठवले. दुसऱ्या दिवशी पाटील झवेरी बाजारात न पोहोचल्याने व्यापारी मुंबईत आला आणि त्याने याबाबत पोलिसांत तक्रारी केली.

# आईच्या फ्लॅटवर डोळा; मुलाने बेस बॉलने जन्मदात्रीला संपवले

✔ सुराज्य/मुंबई

अंधेरी (पूर्व) येथील सात मजली इमारतीत फ्लॅटसाठी खून झाला असल्याचा आरोप नागरिकांनी करण्यात आला आहे. सदस्यांना संशय आहे की, पहिल्या मजल्यावरील १.७५ कोटी रुपयांचा २ BHK फ्लॅट सचिन कपूर (४३) याने बेकायदेशीरपणे हडप केला आहे, ज्यावर त्याची आई वीणा (७४) हिची बेसबॉल बॅटने हत्या केल्याचा आरोप आहे आणि गेल्या आठवड्यात तिचा मृतदेह फेकून देण्यात आला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पोलीस तपास सुरू असल्याची माहिती आहे.

आनंद धाम इमारत क्रमांक ३ मधील सदनिका, सोसायटीच्या नोंदीनुसार, डॉ. मोरेश्वर परांजपे आणि त्यांची विवाहित पत्नी मैथिली यांच्या संयुक्त मालकीची होती. दोघेही मयत झाले आहेत. मैथिली ही कॅन्सरची रुग्ण होती. सोसायटीने त्यांचा मुलगा धनंजय याच्याशी संवाद साधला होता की, सचिनने मैथिलीच्या मृत्यूनंतर दोन दिवसांनी फसवणूक करून फ्लॅटचा ताबा घेतला होता. एक लेखी चिठ्ठी दिवंगत डॉक्टरांनी दिली होती. मुलाने सांगितले की, त्याच्या पत्नीचा मृत्यू झाल्यास, फ्लॅट त्याच्याकडे हस्तांतरित केला जाईल.

७ जानेवारी २0२0 रोजी सोसायटीने अंधेरी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली होती. अंधेरीतल्या नागरिकांनी कपूरला मदत करण्यासाठी पोलीस आणि अधिकाऱ्यांचा हातखंडा असल्याचा आरोप केला आहे. सचिनने सोसायटीला सादर केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसून आले आहे की १ जानेवारी रोजी वास्तविक मालक मैथिलीच्या मृत्यूच्या पाच दिवस आधी म्हणजे २६ डिसेंबर २0१९ रोजी त्याने फ्लॅटची नोंदणी केली होती. दुसऱ्या दिवशी पगारे गायब झाले. या सर्व प्रकरणावर पोलीस तपास करत असून घटनेचा कसून तपास सुरू आहे.

# मोदींनी मेट्रो प्रवासात जवळ घेतलेले बाळ कोणाचे?

**मोदींनी बाळाला जवळ घेतले व आशीर्वाद दिले.**

✔ सुराज्य/नागपूर

**पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांचा नागपूर दौरा संपला, पण त्याचे कवित्व सुरूच आहे. त्यांच्या भरगच्च कार्यक्रमा दरम्यान घडलेल्या घटना, घडामोडींवर चर्चा सुरू आहे. यापैकीच एक चर्चा आहे ती मोदींचा मेट्रो प्रवास आणि या दरम्यान त्यांनी कुशीत घेतलेल्या बाळाची. कोणाचे होते हे बाळ आणि ते मोदींपर्यंत पोहचले कसे? याची कथा रंजक आहे.**




पंतप्रधान नरेंद्र मोदी मेट्रोने प्रवास करणार हे निश्चित झाल्यावर त्यांच्या सोबत कोणकोण असणार यावर चर्चा झाली. पंतप्रधान कार्यालयाकडून आलेल्या सूचनेनुसार १० मिनिटाच्या प्रवासा दरम्यान शाळा, महाविद्यालयातील मुले, मुली, सर्वोत्तम स्टार्ट अपचे मालक, मेट्रोचे अधिकारी, कर्मचारी यांची यासाठी निवड करण्यात आली. स्टार्ट अपचे प्रतिनिधी म्हणून रितिका व सुमीत ताजपुरिया या दाम्पत्याची निवड झाली. त्यांना फक्त दोन मिनिटे मोदी भेटीसाठी देण्यात आले होते. तीन डब्ब्याच्या मेट्रोमध्ये मोदी मधल्या डब्बयात बसले होते. त्यांना भेटणारे त्या लगतच्या डब्बयात बसले होते. रितिका व सुमीत हे त्यांचे दहा दिवसाचे बाळ घेऊन आले होते.

मोदींच्या भेटीच्या वेळी त्यांनी बाळाला सोबत घेतले नव्हते. त्याला बाजूच्या डब्बयात ठेवले होते. मोदींशी दोन मिनिट स्टार्ट अपवर चर्चा झाली. वेळ संपल्याने रितिका यांनी मोदींना त्याचे दहा दिवसांचे बाळ बाजूच्याच डब्बयात असून त्याला आपण आशीर्वाद द्यावे, अशी विनंती केली.

मोदींनी ती मान्य केली व बाळाला आणण्यास सांगितले. रितिका यांनी बाळाला आणतात मोदींनी त्याला जवळ घेतले व आशीर्वाद दिले. यामुळे ताजपुरिया दाम्पत्य भारावून गेले.

# काळूबाई मंदिरात चोरी

## रक्कम मोजणाऱ्यानेच दानपेटीवर मारला डल्ला

✔ सुराज्य/सातारा

**मांढरदेव येथील काळूबाई मंदिरातील दानपेटीतील रक्कम मोजणाऱ्या निवृत्त बँक कर्मचाऱ्यांने रुपये दीड लाखाची रक्कम आणि सोन्याचे दागिन्यांची चोरी केल्याची बाब उघडकीस आली आहे. यामुळे मांढरदेव येथे आणि काळेश्वरी भक्तांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी वाई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून संबंधित कर्मचाऱ्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**

मांढरदेव (ता वाई) येथील काळुबाई देवीच्या चरणी भाविक मोठ्या प्रमाणात देणगी देत असतात. या मिळालेल्या देणगीची दर महिन्याला खाजगी इसमांकडून मोजणी केली जाते. सोमवारी दुपारी दानपेटीतील रक्कम, चिल्लर आणि दानपेटीत टाकलेल्या दागिन्यांची ट्रस्टी आणि ट्रस्टचे कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत खाजगी इसम व बँकेच्या निवृत्त कर्मचाऱ्यांकडून मोजणी सुरू होती.



यावेळी मोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्याने दोन तीन वेळा आत बाहेर केले. यामुळे संबंधितावर या ठिकाणी असणाऱ्या उपस्थितांचे लक्ष होते. खाजगी नेमणुकीवर असलेल्या निवृत्त बँक कर्मचाऱ्यांच्या संशयास्पद हालचालीमुळे ट्रस्टींनी संबंधित कर्मचाऱ्यांची झाडा झडती घेतली. त्यावेळी त्याच्या गाडीत दीड लाखांची रोख रक्कम आणि काही सोन्याचे दागिने आढळून आले. याची माहिती तात्काळ वाईचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे यांना कळविली. त्यांनी सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र तेलतुंबडे यांना पाठवून त्याला ताब्यात घेतले.


# २१ डिसेंबरपासून सिध्देश्वर कृषी प्रदर्शनाचे आयोजन

## ३०० स्टॉल असणार; शेतीविषयक मार्गदर्शन, चर्चासत्रही होणार

✔ सुराज्य/सोलापूर

**कृषी उद्योग उत्पादने अवजारांची शेतकऱ्यांना माहिती मिळावी. त्याची प्रात्यक्षिक पाहता यावे म्हणून श्री सिद्धेश्वर यात्रेच्या निमित्ताने श्री सिध्देश्वर देवस्थान यात्रा समिती व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग व आत्मा व जिल्हा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनाचे २९ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान होम मैदानावर आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी सिध्देश्वर मंदिरामध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.**





दरवर्षी सिद्धेश्वर यात्रेदरम्यान कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. परंतु होम मैदानावर मर्यादित जागेत हे प्रदर्शन भरविण्यास अडचणी निर्माण होत होत्या. म्हणून यंदा यात्रेच्या पूर्वी कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनामध्ये दुग्धोत्पादन, रेशीम पीक, मधुमक्षिका पालन, वर्टीकल फार्मिंग, आधुनिक कृषी अवजारे, खते, औषधे, बी-बियाणे, अवजारे, यंत्रसामुग्री,, ट्रॅक्टर्स, फार्म इक्विपमेंट, सिंचन, फलोत्पादन, पॅकेजिंग व साठवणूक, बायोटेक्नॉलॉजी, टिशू कल्चर, पाणी व्यवस्थापन, ऑटो फार्मिंग टेक्नॉलॉजी, सौरऊर्जा, पशुखाद्य व औषधे, डेरी इक्विपमेंट, पोल्ट्री सोल्युशन, कृषी अर्थसहाय्य, लो बजेट हाऊसिंग सोल्युशन ,कृषी साहित्य, नियतकालिके अशा संस्थांचा सहभाग असणार आहे. या प्रदर्शनामध्ये २०० हून अधिक कंपन्यांचा समावेश असणार आहे. फ्री फॅब्रिकेटेड, स्टॉल्स पिलरलेस डोम स्ट्रक्चर, कृषी तज्ञांच्या भेटी व मार्गदर्शन चर्चासत्र, विविध अवजारे आणि परदेशी भाजीपाला प्रदर्शन अशी यंदाच्या प्रदर्शनाची वैशिष्ट्ये आहेत. यामध्ये कोरडवाहू संशोधन केंद्र, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, आयसीएआर अंतर्गत राष्ट्रीय तृणधान्य कृषी संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र मोहोळ, महाबीज, खादी ग्रामोद्योग, कृषी औद्योगिक आधारित कृषी स्टार्टअप, फळ रोपवाटिका, कृषी महाविद्यालय, कृषी स्टार्टअप उद्योजक, नवा उद्योजक, श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना कुमटे व जिल्ह्यातील सर्व साखर कारखाने, राष्ट्रीयकृत व सहकारी बँका, नाबार्ड यांचा या कृषी प्रदर्शनात विशेष सहभाग असणार आहे. या कृषी प्रदर्शनाची तयारी स्मार्ट एक्सपो ग्रुप सांगलीचे संचालक सोमनाथ शेटे हे करत आहेत. या पत्रकार परिषदेस सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

### ■ गजेंद्र रेडा, एक फूटाची मिरची असणार आकर्षण

दीड टन वजनाचा व एक कोटी रुपये किमतीचा गजेंद्र नावाचा रेडा असणार यंदाच्या प्रदर्शनाचे आकर्षण असणार आहे. याशिवाय जगातील सर्वात लांब एक फूट लांबीची देशी मिरची नागरिकांना पाहायला मिळणार आहे. तसेच जगातील सर्वात लांब १५ इंच लांबीची गव्हाची लोंबी, गोड्या पाण्यात मोत्यांची शेती संदर्भातील माहितीही मिळणार आहे.

### ■ २०० पेक्षा जास्त कंपन्यांचा सहभाग

या प्रदर्शनात २०० पेक्षा जास्त कंपन्यांनी सहभाग नोंदवला आहे ट्रॅक्टर व शेती अवजारे यांचे स्टॉल आहेत वाहन महोत्सव आहे शेतीविषयक प्रक्रिया उद्योग महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या शेतकऱ्यांसाठीच्या सर्व योजनांची माहिती देणारी दालने, सेंद्रिय शेतीचे विशेष दालन पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजनही यंदा करण्यात आले आहे. याशिवाय फळे व फुले प्रदर्शन स्पर्धा गाय म्हैस व बैल प्रदर्शन आधी एकाच प्रदर्शनामध्ये उपलब्ध असणार आहेत.

### ■ ३१ डिसेंबर रोजी न्यू होम मिनिस्टर कार्यक्रम

होम मिनिस्टर फेम क्रांती मालेगावकर यांचा महाराष्ट्रात गाजत असलेला न्यू होम मिनिस्टर, खेळ रंगला पैठणीचा हा कार्यक्रम ३१ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता होम मैदान येथे संपन्न होणार आहे.

---

## रिक्षा-ट्रॅक्टर अपघातातील जखमीचा मृत्यू

✔ **सोलापूर** : रिक्षा व ट्रॅक्टर अपघातात एकाचा मृत्यू झाल्याची घटना दि.६ डिसेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास शिवरंजन लॉज समोर रेल्वे स्टेशन रोड येथे घडली. याप्रकरणी मपोना मंजुळा संभाजी वाघमोडे यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून रिक्षा क्र.एम.एच.१३. एजी.०७१७ यातील चालक आच्छप्पा आसादे (रा. अलकुंटे चौक, सोलापूर) व ट्रक्टर क्र.एम.एच.१३. एजी.९९४१ चा चालक सचिन महादेव वाघमारे (वय-३६,रा.मु.पो. गुंजेगाव ता.दक्षिण सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दि.६ डिसेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास सात रस्ता तर रेल्वे स्टेशन येथे रिक्षा व ट्रॅक्टर हे एकेरी वाहतूक चालू असताना वरील रिक्षा व ट्रक्टर क्रमांक यातील चालकांनी भरधाव वेगात आपले वाहन चालवून एकमेकांना धडक दिल्याने अपघात झाल्याने रिक्षातील सात प्रवासी जखमी झाले. या सात प्रवाशांपैकी गणेश लक्ष्मण गोलेकर (वय-४०,रा.अलकुंटे चौक,लष्कर) यांच्या मृत्यूस व मंगल गोविंद म्हेत्रे यांना जखमी करण्यास कारणीभूत झाले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोसई बेबडे हे करीत आहे.



## दुचाकीच्या कारणावरून डोक्यात घातला दगड

✔ **सोलापूर** : मोटारसायकल देण्याच्या कारणावरून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तरुणाच्या डोक्यात दगड घालून जखमी केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.११ डिसेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान फेमस चप्पल दुकान नई जिंदगी येथे घडली. याप्रकरणी महेबुब बशीर शेख (वय-१७,रा.सत्य साईनगर मजरेवाडी) याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. इराण जमादार व त्याचे दोन मित्र (रा.नई जिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. महेबुब हा इराण जमादार याला माझी गाडी कुठे आहे व मला मोटरसायकल दे नाहीतर पेट्रोलचे पैसे दे असे म्हणाला.त्यावेळी इराण याने त्याचे दोन अनोळखी मित्रास बोलून दगड उचलून महेबुब शेख याच्या डोक्यात मारून जखमी केले आहे. तपास सहायक फौजदार मुद्दे हे करीत आहेत.

---

## मुख्य सचिवांकडील बैठक पुन्हा रद्द; विमानसेवेच्या प्रयत्नाला लागला नाट!

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूरची विमानसेवा सुरू करण्यासंदर्भात राज्याचे मुख्य सचिव म्हणून मनुकुमार श्रीवास्तव यांच्याकडे बुधवार, १४ रोजी बैठक होणार होती. ही बैठक रद्द झाली आहे. सलग दुसऱ्यांदा ही बैठक रद्द झाल्याने विमानसेवेबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. सिद्धेश्वर कारखान्याने बांधलेली बेकायदेशीर चिमणी आणि इतर अडथळ्याबाबत निर्णय घेण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव मनूकुमार श्रीवास्तव यांनी शुक्रवारी दोन वाजता व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे ९ रोजी बैठक बोलावली होती मात्र ही बैठक रद्द झाली. त्यावेळी १४ डिसेंबर रोजी पुन्हा याच विषयावर बैठक होणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले होते. दरम्यान ही बैठकही रद्द झाली आहे. त्यामुळे विमानसेवेबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

### प्रशासनाकडून टाईमपास सुरू : थोबडे

दोनवेळा बैठक रद्द झाल्यामुळे प्रशासनाकडून टाईमपास सुरू आहे, असे वाटत आहे. कुठे तरी साखर कारखानच्याचे प्रशासन राज्यसरकारवर सरस ठरत आहे असे वाटते, हे चुकीचे आहे. दुसरीकडे पोलिसांनीही आमच्या महापालिकेसमोरील आंदोलनाला परवानगी दिली नाही. पूनम गेट येथे आंदोलन करावे, असे पोलिसांचे म्हणणे आहे. मात्र चिमणीबाबतची ऑर्डर आयुक्त काढणार आहेत, त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांपुढे आंदोलन करण्यात काही अर्थ नाही. विचारमंचच्यावतीने याबाबत बैठक घेऊन पुढील दिशा ठरवण्यात येईल, असे संजय थोबडे यांनी म्हटले आहे.

## दुसरे लग्न करून विवाहितेचा केला छळ

✔ **सोलापूर** : पहिल्या लग्नाचा घटस्फोट झाल्याचे सांगून तसेच दुसऱ्या पत्नीला घटस्फोट झाल्याचे भासवून तिच्यासोबत विवाह करून तिला मारहाण करत फसवणूक केल्याप्रकरणी पतीसह चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना लग्नानंतर चार ते आठ दिवसापासून २६ जुलै २०२२ पर्यंत ठाणे येथे सासरी घडली. याप्रकरणी तक्षशिला मिलिंद शिरसे उर्फ तक्षशिला संदीप प्रधान (उघाडे) (वय-३०,रा. कर्णिक नगर) यांनी फिर्याद दाखल केली आहे. पती संदीप रतन उघाडे,सासू लीलावती उघोड, सासरे रतन उघाडे, नणंद प्रतीक्षा अजित पाखरे (सर्व रा.स्वामी देवराव अपार्टमेंट, उल्हासनगर,ठाणे) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक बागवान हे करीत आहेत.

## अवैधरित्या गुटख्याची विक्री; एकावर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

अवैधरिता गुटख्याची विक्री केल्याप्रकरणी एका जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना सरवदे नगर मुळेगाव रोड येथे घडली.सैफन चाँदसाब शेख (वय-४०, रा.सरवदे नगर, मुळेगाव रोड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. सैफन शेख यांच्याकडून ८० पुड्या गोवा गुटखा,१२० पुड्या हाय गुटखा तर २६ पुड्या आरएमडी पानमसाला असा एकूण ९४२ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.हि घटना दि.१२ डिसेंबर रोजी दुपारी एक वाजण्याच्या दरम्यान सरवदे नगर येथे घडली.

आशयाची फिर्याद रेणुका रमेश पाटील सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सैफन शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कुकडे हे करीत आहेत.

## कोकीळ सूर ठाकरे-शिवसेनेला गवसणार?

✔ सुराज्य/अकलूज



शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर अस्वस्थ झालेली शिवसेना आपल्या विश्वासू सहकाऱ्यांच्या माध्यमातून पुनश्च भक्कम होताना दिसत असून सोलापूर जिल्ह्यातही याचा प्रत्यय येताना दिसत आहे. जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या माध्यमातून शिवसेना पुन्हा भरारी घेताना दिसत असून संघटन पातळीवर ती भक्कम होताना दिसते आहे. अलीकडील काळात शिवसेनेत झालेली पडझड त्यातून निर्माण झालेले दोन गट यामुळे महाराष्ट्राच्या अस्मितेवर परप्रांतीय नेतेमंडळी घाला घालताना दिसत आहेत.

अशा अवस्थेत 'गेले ते कावळे राहिले ते मावळे' म्हणत ठाकरे शिवसेना आपल्या कणखर स्वाभिमानी पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून उभारी घेताना दिसते आहे. यातूनच सोलापूर जिल्ह्याची संपर्कप्रमुख पदाची जबाबदारी मुंबई स्थित नगरसेवक बेस्टचे अध्यक्ष अनिल कोकिळ यांच्यावर पडली असून ते सोलापूर जिल्ह्यात शिवसेनेला उभारी देताना दिसत आहेत. या जिल्ह्यात भाजपा, राष्ट्रवादी असे पक्ष जिल्हा काबीज करण्याच्या भूमिकेत दिसत असले तरी शिवसेना देखील यामध्ये भविष्याच्या काळात भक्कमपणे स्पर्धेत असणार आहे, अशी बांधणी संपर्कप्रमुख अनिल कोकिळ यांनी केलेली दिसते आहे. नुकताच आदित्य ठाकरे यांचा सोलापूर जिल्ह्या दौरा पार पडला. यामध्ये अचूक नियोजन करून त्यांनी आपल्या कर्तृत्वाची छाप दाखवून दिली होती. जिल्ह्यातील जुन्या नव्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन अनेकांचे पक्ष प्रवेश त्यांनी घडवून आणले. त्यांच्यातील कुशल संघटनात्मक गुण पाहून स्वतः पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी त्यांची सोलापूर जिल्ह्यासाठी संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती केली असून ठाकरे यांचा विश्वास ते सिध्द करून दाखवताना दिसत आहेत. शिवसेनेत झालेल्या बंडानंतर ठाकरे सेना पदाधिकारी सावध भूमिकेत दिसत आहेत. सोलापूर जिल्ह्यातही तीच परिस्थिती आहे. त्यातच शिंदे यांच्या बंडात जिल्ह्यातील दोन आमदारांचा समावेश असल्याने कोकिळ यांची सतर्कता पक्षाच्या कामी येताना दिसत आहे. यासाठी ते सातत्याने संपर्क दौरे करून पक्ष बांधणीला वेळ देताना दिसत आहेत. त्यांची बांधणी कितपत पक्षाला यश मिळवून देते आणि हा कोकिळ स्वर सोलापूर जिल्हा ठाकरे शिव सेनेला गवसणार का? हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे.

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

### लाविला पंचम स्वर...

शिवसेनेसाठी सध्याचा काळ हा अग्नीपरीक्षेचा काळ आहे. अशा वातावरणात सोलापूर जिल्ह्यात शिवसेना टीकविण्याचे, वाढविण्याचे आव्हान संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्यावर असणार आहे त्यामुळे त्यांना संघटनात्मक बांधणीचा पंचम स्वर लावावा लागणार आहे.

---

## २५ डिसेंबरपूर्वी महापालिका वर्कऑर्डर काढणार

### आजोऱ्यातून वाळू-खडी विलगीकरण प्रकल्प



✔ सुराज्य/सोलापूर

शहरात विविध ठिकाणी टाकण्यात आलेला आजोरा संकलित करून वाळू व खडी विलगीकरण प्रकल्प (सीएनडी वेस्ट प्रोजेक्ट) महापालिकेच्या वतीने बीओटी तत्त्वावर तुळजापूर रोडवरील कचरा डेपो येथे उभारण्यात येत आहे. त्याचा मक्ता अय्यर एन्व्हायरमेंट रिसर्च मॅनेजमेंट कंपनीला देण्यात येणार आहे. धुळीचा प्रादुर्भाव लक्षात घेता येथील खाणीमध्ये हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

२५ डिसेंबर पूर्वी या कंपनीला वर्क ऑर्डर देण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली. येत्या २५ डिसेंबर पूर्वी संबंधित कंपनीला वर्क ऑर्डर देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रकल्पाचे काम सुरू होईल, असे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले. या ठिकाणी जमिनीवर जर हा प्रकल्प सुरू केला तर परिसरात धुळीचा त्रास उद्भवू शकतो. यामुळे याच परिसरातील महापालिकेच्या मालकीची असलेल्या खाणीमध्ये हा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. साधारणतः ५० मीटर खोल ही खाण आहे. जमिनीत खोलवर हा प्रकल्प सुरू केल्यास धुळीचा कोणताही प्रादुर्भाव होणार नाही, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली. शहरात अनेक ठिकाणी बांधकाम करत असताना पाडकामातील अजोरा अनेक जण विविध ठिकाणी परस्पर टाकतात. त्यामुळे अस्वच्छता निर्माण होते. वाहतुकीस अडथळाही निर्माण होतो. हे टाळण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून तुळजापूर रोडवरील कचरा डेपो येथे संकलित केलेल्या आजाऱ्यातून वाळू - खडी विलगीकरण प्रकल्प उभारण्यात येत आहे. कचरा डेपो येथे एकूण पाच एकर जागेवर हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

त्यापैकी दीड एकर जागेवर मूळ प्रकल्प राहणार असून उर्वरित जागेवर अजोरा साठविण्यात येणार आहे. शहरातून संकलित केलेला आजोरा कचरा डेपो येथील या प्रकल्पाच्या ठिकाणी एकत्र करण्यात येईल. त्या ठिकाणी त्यावर प्रक्रिया करून या आजोऱ्यातील खडी व वाळू वेगळी करण्यात येईल. ही विलगीकृत वाळू व खडी त्यानंतर विक्री करण्यात येणार आहे. सुमारे १३ कोटींचा हा प्रकल्प आहे. शहरात स्वच्छता राखण्यासाठी या प्रकल्पाची मोठी मदत होणार आहे.

### १३ कोटींचा प्रकल्प; शासनाकडून ७.५ कोटींचा निधी

एकूण सुमारे १३ कोटीचा हा प्रकल्प आहे. त्यापैकी साधनसामग्रीसाठी शासनाकडून ७.५ कोटीचा निधी आजोरा विलगीकरण प्रकल्पासाठी मंजूर केला आहे. शासनाने शेडसाठी साडेसात कोटी रुपयाचा निधी दिला आहे. मुंबई, पुणे, ठाणे, पिंपरी -चिंचवड यासह इतर महानगरपालिकांच्या माध्यमातूनही असा प्रकल्प सुरू आहे. आता सोलापुरात हा प्रकल्प सुरू करण्यात येत आहे. या प्रकल्पाची निविदा काढण्यात आली आहे. या कामाचा मुक्ता अय्यर एन्व्हायरमेंट रिसर्च मॅनेजमेंट कंपनीला निश्चित करण्यात आला आहे. येत्या २५ डिसेंबर पूर्वी वर्क ऑर्डर देण्यात येणार आहे.

## स्मार्ट सिटीच्या संचालकपदी संगोराम, जोशी

✔ सुराज्य/सोलापूर

स्मार्ट सिटीच्या नूतन संचालक पदी प्राजक्ता संगोराम - कुलकर्णी व सर्वेशी जोशी यांची पात्रता निक्षानुसार नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शितल तेली -उगले यांनी दिली. सर्क्युलर रेसुलेशन पात्रता निकषाप्रमाणे त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान गुरुवारी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन संचालक मंडळाची बैठक होणार आहे.

दरम्यान डिसेंबर डिसेंबर अखेर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन डायरेक्टर बॉडीची वार्षिक सभा घेण्याचे नियोजन आहे परंतु सध्या दोनच सदस्य आहेत. यामुळे कोरम अभावी सभा तहकूब करावी लागणार आहे. पुन्हा आठवड्यानंतर ती घेण्यात येईल असेही मुख्य कार्यकारी अधिकारी शितल तेली - उगले यांनी सांगितले.

---

## विजयदादांचा लक्ष्मण म्हणून काम करेन : अ‍ॅड.पाटील

### ▶ कट्टर विरोधकाने गायले मोहिते-पाटलांचे गोडवे

✔ सुराज्य/अकलूज




विजयदादा राष्ट्रवादी काँग्रेस किंवा काँग्रेस मध्ये असले असते तर महाविकास आघाडीच्या काळात त्यांना मोठे पद मिळाले असते परंतु समाजाला विकासाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या लोककल्याणाच्या धोरणामुळे विजयदादा व मोहिते-पाटील यांनी सुज्ञ निर्णय घेऊन भाजपमध्ये आले मी फक्त विजयदादांना सांगतो की, भाजपमध्ये आहे तो पर्यंत मी आपला लक्ष्मण म्हणून काम करेन असे प्रतिपादन माळशिरस भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते व विजयदादांचे पूर्वीचे प्रतिस्पर्धी राहिलेले अ‍ॅड. सुभाष पाटील यांनी माळशिरस येथील आयोजित सार्वजनिक कार्यक्रमात केले.

पुढे अ‍ॅड. पाटील म्हणाले, लोकांना वाटत असेल सुभाष पाटील विजयदादा विरूद्ध लढले आणि आता दादांच्या हस्ते बोर्डचे उद्घाटन करतात. पण मी लढलो ते आमच्या समाजासाठी लढलो. परंतु विजयदादांनी सर्व समाजाला जाती घटकांना सोबत घेऊन तालुक्यात विकास केला.

विजयदादांनी सर्वात मोठे काम काय केले असेल उजनीच्या कार्यक्षेत्रात तालुका नसताना दादांनी तालुका उजनीच्या कार्यक्षेत्रात घेतला तर माळशिरस तालुका सुजलाम-सुफलाम केला, दुष्काळी तालुक्यात विकासाची गती दिली. तसेच पक्षाने व दादांने मला काही जबाबदारी दिली तर जनतेसाठी उपयोग करेन असेही पाटील म्हणाले, या कार्यक्रमाप्रसंगी धैर्यशिल मोहिते-पाटील, के. के.पाटील, सोपानकाका नारनवर, बाळासाहेब सरगर, माळशिरसचे नगराध्यक्ष अप्पासाहेब देशमुख व इतर मान्यवर उपस्थित होते.

### माळशिरस तालुक्यातील बदलते राजकीय समीकरण

तालुक्यातील धनगर समाजाचे जेष्ठ नेते अ‍ॅड. सुभाष पाटील यांनी भाजपच्या तिकीटावर १९९०, १९९५, १९९९ सालच्या विधानसभा निवडणुका विजयदादांच्या विरोधात लढवल्या होत्या. मोहिते-पाटील यांचे पूर्वीचे पारंपरिक विरोधक असलेले सुभाष पाटील व मोहिते-पाटील एकत्र आल्याने भाजपची ताकद आणखी वाढणार आहे.

### राजकारण कसे करावे दादा-अण्णांकडून शिकावे : धैर्यशील

आजकाल सगळ्याच गोष्टींकडे राजकीय रंगाच्या चष्म्यातून पाहण्याची, वाद घालण्याची, प्रतिवाद करण्याची प्रथा रूढ होतेय, परंतु माळशिरस तालुक्यात सुसंस्कृत, सभ्य, संवेदनशील राजकारण कसे करावे याचा परीपाठ विजयदादा व सुभाष अण्णा यांनी नव्याने घालून दिला आहे. राजकिय विरोध कितीही असला तरी राजकारणातील सभ्यता आणि सुसंस्कृतपणा कसा जपावा हे आद.विजयदादा व जेष्ठ नेते सुभाष आण्णा यांच्याकडून शिकण्यासारखे आहे, असे भाजपाचे संघटन सरचिटणीस धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी सांगितले.

## सोलापूर शहर झाले कोरोनामुक्त; १२ दिवसांपासून एकही रूग्ण नाही

✔ सुराज्य/सोलापूर

गेल्या १२ दिवसांपासून एकही कोरोना रुग्ण आढळून आला नाही. मात्र यापूर्वी आढळून आलेल्या दोन रुग्णांवर उपचार सुरू होते. अखेर आठवडाभरात हे रुग्ण बरे होऊन घरी परतल्याने शहर पुन्हा एकदा कोरोनामुक्त झाले आहे.

१२ एप्रिल २०२० रोजी शहरात पहिला कोरोना रुग्ण आढळून आला होता. यानंतर त्या रुग्णाचा मृत्यूही झाल्याने शहरात सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर तब्बल दीड वर्षानंतर शहर कोरोनामुक्त झाले होते. मात्र पुन्हा फेब्रुवारीत कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला. पुढे उपचारानंतर रूग्ण बरे होत गेले.

आता गेल्या दोन आठवड्यात एकही कोरोना रुग्ण आढळून आला नाही. गेल्या आठवड्यात जिल्हा ग्रामीण भाग कोरोनामुक्त झाल्यानंतर शहरात दोन रुग्ण उपचार घेत होते. हे रूग्णही कोरोनामुक्त होऊन घरी परतल्याने आता शहरात कोणतेही अ‍ॅक्टिव्ह रुग्ण नाही.त्यामुळे शहर पूर्णपणे कोरोनामुक्त झाल्याची माहिती अहवालाद्वारे प्रशासनाने दिली आहे.

### ६ लाख २८ हजार संशयितांच्या चाचण्या

कोरोना काळात ६ लाख २८ हजार २०७ संशयित रुग्णांच्या तपासण्या करण्यात आल्या होत्या. त्यापैकी ३४ हजार ५३९ रुग्ण संक्रमित आढळून आले होते. तर यामधील १५१५ जणांचा बळी गेला. शहरातील पात्र ८ लाख १४ हजार ५६५ जणांपैकी ६ लाख ८७ हजार ८६० जणांनी कोरोना प्रतिबंधकचा पहिला डोस तर ५ लाख २२ हजार ६८४ जणांनी दुसरा डोस घेतला. मात्र केवळ ४८ हजार ८१० जणांनीच बूस्टर डोस घेतला आहे.